POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे


● वर्ष-०५ ● अंक-३२६ ● मुंबई, रविवार, २८ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे महाराष्ट्रात एकच खळबळ माजली आहे. राज्यभरातील लाखो उमेदवारांना झटका लागला असून त्यांना आता पुढे काय याची चिंता सतावतेय. याबद्दल परीक्षा परिषदेच्या उपायुक्त प्रिया शिंदे यांनी सगळी माहिती सांगितली आहे.

टीईटी पेपर फुटताच सरकारचा मोठा निर्णय

पुन्हा परीक्षा कधी, पुन्हा नोंदणी अन् शुल्क भरावे लागणार का? परिषदेने केलं स्पष्ट





■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

महाराष्ट्राला पेपर फुटेची ग्रहण लागलंय असं दिसतंय. नीट पेपर लीक झाल्यानंतर आता टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणात पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे. टीईटी परीक्षा रविवारी २८ जून २०२६ होणार होती. पण परीक्षेच्या आदल्या दिवशी या पेपरफुटीमुळे एकच गोंधळ उडला आहे. आता ही परीक्षा पुढे ढकलण्याची नामुष्की सरकारवर आली आहे.

राज्यातील लाखो उमेदवार आता या परीक्षेच्या पुढे ढकल्यामुळे चिंतेत आहे. अशात परीक्षा परिषदेच्या उपायुक्त प्रिया शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन त्यांनी या परीक्षेबद्दल पुढे काय निर्णय घेण्यात आले हे स्पष्ट केलं आहे. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा ही इयत्ता पहिली ते आठवीच्या शिक्षक पदांसाठी उमेदवारांची पात्रता निश्चित करण्याकरिता टरउए, पुण्याकडून ही परीक्षा महाराष्ट्रात घेतली जाते.

परीक्षा परिषदेच्या उपायुक्त प्रिया शिंदे यांनी सांगितलं की, टीईटीचा पेपर फुटल्यानंतर ती परीक्षा आता पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही परीक्षा लवकरच होणार असून नियोजित तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल. अशा प्रकारची परीक्षा घेण्यासाठी तीन आठवड्यांची प्रक्रिया असते, त्यामुळे ही परीक्षेबद्दल लवकरच सांगण्यात येईल. पुढील दोन ते तीन दिवसांत परीक्षेची नवीन तारीख जाहीर करण्यात येईल. या परीक्षेसाठी महाराष्ट्रातून 6 लाख 128 शिक्षकांनी नोंदणी केली होती. परीक्षा रद्द झाल्यानंतरही या शिक्षकांना पुन्हा नोंदणी करण्याची गरज नाही, असं स्पष्ट करण्यात आलं आहे. त्या पुढे म्हणाल्यात की, पेपरफुटी प्रकरणात शिक्षक इच्छुक उमेदवारांचा काही दोष नाही. त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार टाकला जाणार नाही. म्हणजे त्यांना पुन्हा कुठलेही शुल्क भरावे लागणार नाही.

आरोपी दिल्लीतून आले, इतक्या कोटींचा सौदा

टीईटी पेपर फुटीप्रकरणी पोलिसांकडून खळबळजनक माहिती

■ठाणे। प्रतिनिधी,

नीट पेपरफुटीनंतर महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या टीईटी पेपर फुटीचंही आता दिल्ली अन हरयाणा कनेक्शन समोर आलं आहे. उद्या 28 जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करण्यात आली असून पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे.

विमानतळ परिसरातून भिवंडी पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या. त्यानंतर, अपर पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी पत्रकार परिषद घेऊन टीईटी पेपर फुटीसंदर्भात माहिती दिली. भिवंडी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून यातील 2 आरोपी बिहारमधील आहेत, तर एक आरोपी हरियाणामधला आहे. दीड कोटी रुपयांत या पेपरचा व्यवहार ठरला होता, मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे ही पेपरफुटी समोर आली.

टीईटी पेपर विक्रीसाठी आरोपि दिल्लीतून आले होते. त्यामध्ये, राजीव शाह (बिहार), आकाश कुमार (बिहार) आणि धीरज कुमार (हरियाणा) अशी आरोपींची नावे असून त्यांचे वय अनुक्रमे 45, दुसरा 30 आणि तिसऱ्याचं 28 वर्षे आहे. मात्र, याप्रकरणातील मुख्य आरोपी अद्यापही फरार आहे. आरोपींकडून या पेपर विक्रीसाठी दीड कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. पोलिसांच्या झडतीत 4 सेट पेपर मिळाले असून मोबाईल डेबिट कार्ड देखील मिळाले आहेत. पोलिसांनी, भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) ३१६(५) ६१(२), सह महाराष्ट्र परीक्षाअधिनियम २०२४ या प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

परीक्षा विभागाकडून पडताळणी

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींसाठी ट्रॅप लावण्यात आला होता. आरोपी दिल्लीवरुन पेपर विकण्यासाठी भिंवडीला आले होते, कोणासाठी पेपर विकायला आले होते, कोणाला विकला, कुणी घेतला? या सर्व बाबींचा तपास करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, आरोपींकडून जे पेपर विकत घेणार होते, ते विविध रकमा घेऊन पुढे विकणार होते, अशी माहिती समोर आल्याचेही पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी दिली. पोलिसांना आढळून आलेले पेपर शिक्षण विभागाला पाठवले, त्यांनी पेपर पडताळले असता हे पेपर त्याच परीक्षेचे आहेत, असे निष्पन्न झाल्याची माहितीही दुधे यांनी दिली.

कोचिंग सेंटरचीही चौकशी होणार

दरम्यान, याप्रकरणी स्पेशल रक्ष नेमण्यात आली असून डीसीपी पवन बनसोडे यांच्यामार्फत ही टीम नेमली आहे. आरोपींना पेपर कुठून मिळाला हे तपासातून कळेल, सर्व शक्यता गृहीत धरली आहे. याप्रकरणातही कोचिंग सेंटर आणि सर्वांची चौकशी करणार असून पेपर घेऊन दिल्लीहून आरोपी इथं पोहोचले आहेत. प्राथमिक तपासात शिक्षण विभागाचा सहभाग आढळला नाही, यातील एका आरोपी केंद्रीय विद्यालयात नोकरी लावण्यासाठी पैसे दिले होते, तर एका आरोपीने ळएळ ची परीक्षा दिली असून तो त्यात नापास झाला होता.

रविवारची परीक्षा रद्द, पुढे ढकलली

28 जून, 2026 रोजी आयोजित करण्यात आलेली शिक्षक पात्रता परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा पूर्ण पारदर्शकपणेच व्हावी हा परीक्षा परिषदेचा आग्रह असल्याने व याबाबत सखोल चौकशी होणे गरजेचे वाटत असल्याने ही परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. शिक्षक पात्रता परिक्षेबाबत अद्यावत माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

परीक्षा शुल्क पुन्हा द्यावे लागणार नाही

महाराष्ट्रातील 6 लाख 128 शिक्षकांसाठी घेण्यात येणारी टीईटी परीक्षा रद्द करण्यात आली असून ह्या परीक्षेसाठी पुन्हा नोंदणी करण्याची गरज नाही. त्यामुळे, परीक्षेसाठी राज्यातील 6 लाख 128 परिक्षार्थींकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. येत्या 2 ते 3 दिवसांनी टीईटी परीक्षेची नवीन तारीख घोषीत केली जाईल, 37 शहरातील 1028 परिक्षा केंद्रावर पुन्हा नव्याने परिक्षा घेतली जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या उपायुक्त प्रिया शिंदे यांनी दिली.

राज्यातील एमएसएमई उद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन कटिबद्ध

उद्योग विभागात 'फॉलो-अप सेल' व स्वतंत्र आयुक्तालयाची स्थापना करणार -उद्योगमंत्री उदय सामंत

■ठाणे। प्रतिनिधी,



महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी राज्य शासन पूर्णपणे कटिबद्ध असून, उद्योग विभागातील धारिका लाल फितीत न अडकवता त्यांना 'फास्ट ट्रॅक'वर मंजुरी देणारी गतीमान व्यवस्था निर्माण केली जाईल, अशी ग्वाही राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. महाराष्ट्र शासन आणि उद्योग विभागाच्या वतीने आयोजित 'महाराष्ट्र एमएसएमई (MSME) शिखर परिषद आणि पुरस्कार 2026' सोहळ्यात ते बोलत होते.

या प्रसंगी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बलगन, विकास आयुक्त डॉ. कादंबरी बळकवडे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सह-मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकास पानसरे, सह-व्यवस्थापकीय संचालक प्रशाली दिघावकर, उपाध्यक्ष जयदीप कवाडे, मिलिंद कांबळे आणि प्रल्हाद कक्कड आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यात जे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (Micro, Small and Medium Enterprises) एमएसएमई घटक सध्या आर्थिक अडचणीत आहेत, बंद पडले आहेत किंवा राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधीकरणाकडे गेले आहेत, त्यांचे उद्योग विभागामार्फत तातडीने सर्वेक्षण केले जाईल. या अचूक विदाच्या (डेटा) आधारे त्यांना कर्ज पुनर्रचना किंवा विशेष पॅकेज देऊन पुन्हा पायावर उभे केले जाईल. परदेशात स्थायिक झालेल्या ज्या मराठी उद्योजकांना आपल्या मातृभूमीत-महाराष्ट्रात परतून स्वतःच्या उद्योगाचा विस्तार करायचा आहे किंवा नवीन प्रकल्प सुरू करायचा आहे, त्यांना राज्य शासनातर्फे विशेष आणि आकर्षक सवलती (इन्सेन्टिव्ह) दिल्या जातील. हा सोहळा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम न राहता, उद्योजकांना त्यांच्या जिल्ह्यात किंवा औद्योगिक क्षेत्रात भेडसावणाऱ्या समस्या आणि परवानग्यांचा नियमित पाठपुरावा करण्यासाठी उद्योग विभागात एका समर्पित 'एमएसएमई फॉलो-अप सेल'ची स्थापना करण्यात येत आहे.

लहान उद्योजकांवरील सुरुवातीचा आर्थिक भार कमी करण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. नवीन जागा खरेदी करताना जमिनीच्या दरामध्ये सवलत देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला असून, या जमिनींवर लागणाऱ्या स्थानिक करांमध्येही सवलत दिली जाईल. तरुण आणि महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे हाच यामागील मुख्य हेतू असून या सवलतींची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

भारतीय रिझर्व्ह बँकेने गुंतवणुकीत आणि उद्योगात महाराष्ट्राला सलग सहाव्यांदा देशात प्रथम क्रमांकाचा बहुमान दिला आहे. या यशाचे श्रेय राज्यातील प्रामाणिक उद्योजकांना देताना मंत्री महोदयांनी सांगितले की, 'मैत्री' एकल खिडकी प्रणालीच्या माध्यमातून 98 ते 99 टक्के परवानग्या अवघ्या 30 दिवसांत दिल्या जात आहेत. गडचिरोली जिल्हा हा सध्या नवीन 'उद्योग हब' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. जागतिक कंपन्यांचे प्रत्यक्ष उत्पादन सुरू झाले असून, उद्योग क्षेत्राच्या सुरक्षेची आणि सहकार्याची पूर्ण जबाबदारी शासनाची राहील.

माथाडी कायद्याचा गैरवापर करून उद्योजकांना धमकावणाऱ्या किंवा लेबर सप्लायच्या नावाखाली ब्लॅकमेल करणाऱ्या बोगस संघटना व गुंड प्रवृत्तींचा बीमोड करण्यासाठी गृह विभागाच्या सहकार्याने 'मोक्का' अंतर्गत कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उद्योजकांनी अशा खंडणीखोर प्रवृत्तींना बळी न पडता थेट उद्योग विभाग किंवा पोलिसांकडे तक्रार करावी, असे आवाहनही उद्योग मंत्री उदय सामंत यांनी यावेळी केले.

उद्योग क्षेत्राला अधिक बळ देण्यासाठी उद्योग विभागासाठी स्वतंत्र आयुक्तालय स्थापन करून नवीन पदनिर्मिती करण्यात येणार आहे. तसेच, उद्योजकांच्या अडचणी थेट सोडविण्यासाठी स्वतंत्र 'जनता दरबार' भरविण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी घोषित केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाचे स्मरण करत, महाराष्ट्राला उद्योग क्षेत्रात जगात अव्वल स्थानी नेण्याचा संकल्प उद्योगमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाला शुभेच्छा संदेश दिला. "उद्योजक सुरक्षित, तर महाराष्ट्र समृद्ध!" असे सांगून या सोहळ्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या 22 यशस्वी उद्योजकांचा अधिकृत पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकास पानसरे यांनी केले.

गाडी थांबताच व्यावसायिकाची वरळी सी-लिंकवरुन समुद्रात उडी



■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील वरळी सी-लिंकवरुन समुद्रात उडी मारुन आत्महत्या केल्याची आणखी एक घटना समोर आली आहे. एका व्यावसायिकाने समुद्रात उडी मारुन आपली जीवनयात्रा संपवली आहे. वरळी सी-लिंकवरुन जात असताना त्याने टॅक्सी चालकाला मळमळ होत असल्याचं सांगत गाडी थांबवण्यास सांगितली. यानंतर त्याने समुद्रात उडी मारली. घटनेची माहिती मिळताच बचावपथकाने घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता. वरळी सी लिंकवरून भावेश मजेडिया नावाच्या व्यक्तीने समुद्रात उडी मारुन जीवन संपवलं आहे. भावेश मजेडिया हे एक व्यावसायिक असून ठाण्याचे रहिवासी आहेत. टॅक्सीने जात असताना त्यांनी टॅक्सी चालकाकडे 'मला जरा मळमळत आहे, टॅक्सी थांबव' अशी विनंती केली. चालकाने टॅक्सी थांबवताच भावेश मजेडिया यांनी समुद्रात उडी मारली. यानंतर चालकाने तात्काळ पोलिसांना याची माहिती दिली. घटना समजताच बचावर पथक घटनास्थळी दाखल झालं. जोराचा वारा असल्याने कर्मचाऱ्यांना शोध घेताना अडथळे येत होते. शर्थीच्या प्रयत्नानंतर मृतदेह हाती लागला. नायर रुग्णालयात नेताच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. भावेश मजेडिया (51) यांनी आर्थिक तणावातून आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

राज्यात पावसाची तूर्त विश्रांती

जुलैपासून पुन्हा पडणार... हवामान खात्याचा अंदाज

संपूर्ण महाराष्ट्र मान्सूनने व्यापलेला असला तरी, गेल्या दोन दिवसांच्या वृष्टीनंतर पावसाने काहीशी ओढ दिली असून जुलैच्या सुरुवातीलाच त्याचा जोर वाढणार आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,



मुंबईत १ ते ५ जुलै मुसळधार पाऊस

१ ते ५ जुलै या कालावधीत मुंबईत ३५० ते ४५० मिमी पावसाची शक्यता असल्याने पुन्हा एकदा मुसळधार पावसाचे पुनरागमन होईल.

मुंबईसह अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या ऊन पडले असून, पावसाचा जोर ओसरल्याचे चित्र दिसत आहे, कारण सध्या अरबी समुद्र किंवा बंगालच्या उपसागरात कोणतीही मोठी हवामान प्रणाली किंवा कमी दाबाचे क्षेत्र तयार झालेले नाही. मात्र, ही विश्रांती केवळ काही दिवसांची असून, २८ जूननंतर मान्सून पुन्हा सक्रिय होईल आणि १ जुलैपासून महाराष्ट्रात पावसाचा मोठा तडाखा बसण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. २८ आणि २९ जून रोजी पावसाचा जोर पुन्हा वाढण्यास सुरुवात होईल, ज्यामध्ये नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, हिंगोली, परभणी, नांदेड आणि कोकणातील सर्व जिल्ह्यांचा समावेश असेल. अहिल्यानगर आणि बीडमध्येही पावसाचा अलर्ट देण्यात आला असून उत्तर व दक्षिण मध्य महाराष्ट्रात ढगाळ वातावरण आणि विजांच्या कडकडाटासह हलका पाऊस अपेक्षित आहे.

२ जुलै नंतर धो धो पाऊस राज्यात 2 जुलैपासून धो धो पाऊस बरसणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. या दिवसापासून राज्यभरात नियमित आणि मुसळधार पावसाची शक्यता आहे. जूनमध्ये राज्यातल्या अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस पडणे अपेक्षित असते. परंतु,'अल निनो'चा प्रभाव असल्याने राज्यातल्या अनेक भागात पाऊस कमी झालास, अशी माहिती प्रादेशिक हवामान खात्याच्या रिसर्चमध्ये समोर आली आहे.राज्यात 2 जुलैपासून मुसळधार पाऊस सर्वदूर नियमित होईल. असेही प्रादेशिक हवामान खात्याचे म्हणणे आहे.

जीवंतपणीच्या यातना मरणानंतरही संपल्या नाहीत

साने गुरुजींच्या अमळनेरमध्ये कचरा घंटागाडीतून मृतदेहाची वाहतूक

नेमकं काय घडलं?

जळगावच्या अमळनेर जिल्ह्यात एक बेवारस मृतदेह आढळला होता. या मृतदेहाचे ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मृतदेह अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीत पाठवण्याची जबाबदारी ही संबंधित यंत्रणेकडे असते मात्र या सगळ्यात एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मृहदेह हा शववाहिकेतून नेण्याऐवजी तो कचऱ्याच्या घंटागाडीतून नेल्याचा प्रकार समोर आला आहे. शवविच्छेदनाची प्रक्रिया झाल्यावर मृतदेह वाहतुकीसाठी गाडी उपलब्ध करून देणं संबंधित ठेकेदारासाठी महत्त्वाचं असतं, मात्र नियम पायदळी तुडवून नगरपरिषदेच्या कचऱ्याच्या गाडीतून तो मृतदेह हा थेट समशानभूमीत पोहोचवण्यात आला. ही बाब समोर आल्यावर नागरिकांनी संताप व्यक्त केला असून मृत्यूनंतर प्रशासन मृतदेहाची विटंबना करणं हे अस्वीकार्य आहे असे त्यांचं म्हणणं आहे.



■मुंबई। प्रतिनिधी,

जळगावच्या अमळनेर जिल्ह्यातून माणुसकीला काळिमा फासणारी आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. अमळनेर हे साने गुरुजी यांच्या नावाने ओळखले जातात अमळनेरची ओळख प्रति पंढरपूर म्हणून अशी देखील आहे मात्र या ठिकाणी मृतदेहाची विटंबना झाल्याने खळबळ माजली. ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन झाल्यानंतर चक्क कचऱ्याच्या गाडीतून मृतदेह अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीत नेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून प्रशासनावर प्रश्न उपस्थित केले जात आहे.

काय म्हणाले अधिकारी?

अमळनेर जिल्ह्यात बेवारस मृतदेहावर शवविच्छेदन करून तो शववाहिकेऐवजी कचऱ्याच्या गाडीने स्मशानात नेण्याचा प्रकार समोर आल्याच्या घटनेला अमळनेर नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश शिंदे यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. या गंभीर प्रकाराची चौकशी करून ठेकेदारावर दंडात्मक अथवा ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करण्याची कारवाई करण्याची प्रतिक्रिया फोनवरून दिली आहे.

मृतदेह स्वतंत्र वाहनातून नेण्यासंदर्भात ठेकेदाराला बंधनकारक असताना देखील त्याने कचऱ्याच्या गाडीत मृतदेह वाहून नेल्याने संताप व्यक्त होत आहे. मृत्यूनंतरही माणसाच्या अशी अवहेलना होत असेल ही केवळ प्रशासकीय अथवा ठेकेदाराची चूक नसून मानवतेलाच काळिमा फासणारी बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे.

वन्यजीव तस्करी टोळीचा डीआरआयकडून पर्दाफाश

बंदिस्त अवस्थेतील दुर्मिळ प्राण्यांची सुटका



महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) नागपूर विभागाने (मुंबई क्षेत्र) आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यात सुरू असलेल्या वन्यजीव तस्करीच्या एका मोठ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मालाबार जायंट स्क्विरल, १ इंडियन स्टार कासव आणि १४ जंगल फाऊल यांची सुटका करण्यात आली. यानंतर केलेल्या सखोल चौकशीतून, श्रीकाकुलमपासून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर असलेल्या रायाकुर्डी गावात एका दुर्गम ठिकाणचा शोध लागला. तेथून दोन स्मॉल इंडियन सिव्हेटच्या पिल्लांचीही यशस्वी सुटका करण्यात आली. या कारवाईमुळे तस्करीला मोठ्या प्रमाणात आळा बसणार आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) नागपूर विभागाने (मुंबई क्षेत्र) आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यात सुरू असलेल्या वन्यजीव तस्करीच्या एका मोठ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मालाबार जायंट स्क्विरल (शेकरू), इंडियन स्टार कासव, जंगल फाऊल आणि स्मॉल इंडियन सिव्हेट यांसारख्या दुर्मिळ वन्यप्राण्यांची अवैध व्यापार सुरू असल्याचे उघडकीस आले आहे.

बुधवार आणि गुरुवार अशा दोन दिवस चाललेल्या या धडक कारवाईत डीआरआय अधिकाऱ्यांनी श्रीकाकुलम शहरात एका संशयित इसमाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून पिंजऱ्यात बंदिस्त अवस्थेत असलेले ४ मलाबार जायंट स्क्विरल, १ इंडियन स्टार कासव आणि १४ जंगल फाऊल यांची सुटका करण्यात आली.

यानंतर केलेल्या सखोल चौकशीतून, श्रीकाकुलमपासून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर असलेल्या रायाकुर्डी गावात एका दुर्गम ठिकाणचा शोध लागला. तेथून दोन स्मॉल इंडियन सिव्हेटच्या पिल्लांचीही यशस्वी सुटका करण्यात आली. या कारवाईमुळे तस्करीला मोठ्या प्रमाणात आळा बसणार आहे.

कायद्याचे उल्लंघन

मलाबार जायंट स्क्विरल, स्मॉल इंडियन सिव्हेट आणि इंडियन स्टार कासव हे प्राणी वन्यजीव (संरक्षण) कायद्याच्या 'शेड्युल-१' अंतर्गत येतात. या कायद्यानुसार, या प्राण्यांची शिकार करणे, त्यांना बाळगणे, वाहतूक करणे किंवा त्यांचा व्यापार करणे हा गंभीर गुन्हा असून त्यांना सर्वोच्च संरक्षण कवच प्रदान करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेले प्राणी आणि संशयित आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी श्रीकाकुलम वनविभागाच्या ताब्यात देण्यात आले.

बेकायदेशीर व्यापारामुळे जैवविविधतेला गंभीर धोका

विदेशी पाळीव प्राण्यांच्या बाजारात आणि वन्यजीव संग्राहकांमध्ये या प्राण्यांना मोठी मागणी असल्याने तस्करीचे प्रमाण वाढले आहे. अशा बेकायदेशीर व्यापारामुळे जैवविविधतेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. वनविभाग आणि इतर यंत्रणांच्या समन्वयाने वन्यजीव तस्करी रोखण्यासाठी डीआरआय सदैव सतर्क आहे, अशी माहिती डीआरआयच्या अधिकाऱ्याने दिली.



संपादक

दिपक मोरेश्वर नाईक

मानवतावादी संघटना गप्प का?



लोहगडावरील केतन अगरवाल हत्याकांडाचे प्रकरण सध्या सर्वत्र चर्चेत आहे. त्याची हत्या करणारी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांना पोलिसांनी अटक केली आहे. कुणी त्यांच्या विरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे, तर कुणी सियाला लोहगडाच्या कठड्यावरून खाली ढकलून देण्याची शिक्षा देण्यास सुचवले आहे. पोलीस चौकशीतून आणखी काही धक्कादायक गोष्टी समोर येतील. आणखी काही आठवडे त्यावर चर्वितचर्वण होईल आणि एक ना एक दिवस दोन्ही आरोपी जामिनावर सुटून उजळ माथ्याने समाजात वावरतील. तोपर्यंत जनता ते प्रकरण विसरलीही असेल. अशी अनेक हत्याकांडे होत रहातात. वर्ष २०२५ मध्ये गाजलेले राजा रघुवंशीचे प्रकरणही गंभीर होते. राजा आणि सोनम यांचा विवाह झाला; पण सोनमचे दुसऱ्या तरुणासमवेत प्रेमसंबंध होते. त्यामुळे तिने प्रियकर आणि मित्र यांच्या साहाय्याने राजाची हत्या केली. नौदल अधिकारी असणाऱ्या सौरभ राजपूत याचीही हत्या मुस्कानने केली. का? तर म्हणे तिला तिच्या प्रियकरासमवेत लग्न करायचे होते. मुस्कानने हत्येनंतर सौरभच्या शरिराचे १५ तुकडे केले. बोटांचे ठसे नष्ट करण्यासाठी त्याचे मनगट तोडले आणि ओळख पटण्यास अडथळा निर्माण करण्यासाठी त्याचे शिर धडावेगळे केले. पालकांचा आपल्या प्रेमसंबंधांना विरोध होता; म्हणून श्वेताने प्रियकराच्या साहाय्याने स्वतःचे वडील, आई आणि बहीण यांची निर्घृण हत्या केली. तिने त्या सर्वांवर अनेक वेळा वार केले. असे क्रूर कृत्य करण्याची बुद्धी होते कशी? सोनम, मुस्कान, सिया ही उदाहरणे आज समाजाच्या समोर आली आहेत; पण आणखी अशी किती प्रकरणे असतील? पटत नाही किंवा स्वतःच्या इच्छेविरुद्ध होत आहे; म्हणून एखाद्याचा जीव घेण्याची तरुणींमधील ही वाढती मनोवृत्ती भीतीदायक आहे. समाजधुरिणांनी यावर विचार करणे आवश्यक! स्त्रियांवर कुठे अत्याचार झाला की, लगेचच विविध महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, तथाकथित मानवतावादी संघटना, स्त्रीमुक्ती संघटना लगेच सक्रीय होतात; पण मग पुरुषांवर महिलांकडून अन्याय झाला, तर याच संघटना आणि कार्यकर्ते कोणत्या बिळात जाऊन लपतात? अशा वेळी मानवाधिकारवादी गट किती सक्रीय असतात? क्रूर हत्या करणार्या सोनम, मुस्कान, श्वेता, सिया यांच्या विरोधात या संघटनांनी मत प्रदर्शित केल्याचे कुठे पहाण्यात किंवा वाचणात आले नाही. महिलांची राक्षसी वृत्ती या संघटनांना दिसली नाही का कि दिसूनही त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले? येथे स्त्री किंवा पुरुष या दृष्टीने न बघता न्याय, समानता, माणुसकी या पार्श्वभूमीवर विचार करायला हवा. पीडित पुरुष किंवा त्याचे कुटुंबीय यांनाही न्याय मिळाला पाहिजे. या संघटना गुन्हेगार महिलांच्या विरोधात आंदोलने का करत नाहीत? का निवेदने देत नाहीत? न्यायाचा मापदंड सर्वांसाठी समान का नाही? स्त्रीवादी चळवळींचे स्वरूप एकांगी होत चालल्याने त्यांच्याविषयीची विश्वासार्हता न्यून होत आहे का? याचे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. जर एखाद्या पुरुषाने केवळ आई-वडिलांच्या दबावामुळे भावी पत्नीची हत्या केली असती, तर त्याला उत्तरदायी धरून कठोर शिक्षेची मागणीही करण्यात आली असती. मग स्त्रियांचेच समर्थन का? काही स्त्रीवाद्यांनी मध्यंतरी एका स्त्रीद्वेषी विनोदावरून एका तरुणाचा जीव घेण्याची इच्छा प्रदर्शित केली होती, तसेच देशातील प्रत्येक पुरुषाला हिणवण्यासाठी आठवडाभर सहस्रो 'रिल्स'ही बनवली; पण याच स्त्रीवादी आज खुनाचा आरोप असलेल्या २० वर्षांच्या सियाला वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत आहेत. हा दुतोंडीपणा नव्हे का? काही स्त्रीवादी महिला सामाजिक माध्यमांवर निरर्थक पद्धतीने व्यक्त होत आहेत. निर्दयी पद्धतीच्या हत्यांचे समर्थन करत आहेत. पीडित तरुणाच्या कुटुंबियांविषयी त्यांच्या मनात ना आदर आहे, ना सहानुभूती! या संघटनाचा पाया खरोखर न्याय आहे कि केवळ स्त्रीमुक्तीच्या नावाखाली पुरोगामित्वाचा डांगोरा पिटणे आहे, याचाही अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. स्त्रीवाद म्हणजे काय, हेच ठाऊक नसणाऱ्या अशा संघटनांची निष्क्रीयता पहाता भविष्यात पुरुषवादी किंवा पुरुषमुक्ती संघटना आणि चळवळी उभ्या राहिल्यास आश्चर्य वाटू नये. या सर्वच सूत्रांच्या जोडीला 'मानवाधिकार' या संकल्पनेची पुनर्व्याख्या करणे अपरिहार्य आहे. 'आधुनिक भारतात महिलाही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून वाटचाल करत आहेत', असे काही काळापूर्वी म्हटले जायचे; पण आता तर पुरुषांच्या एक नव्हे, तर २-४ पावले पुढे, अशी त्यांची वाटचाल चालू आहे. गुन्हेगारी जगतात महिलांचे प्रमाण लक्षणीय होत चालले आहे. याला नेमके कोण कारणीभूत आहे? गुन्हेगार महिलांमध्ये धाडस वाढले आहे कि हिंसकता? सिया गोयल प्रकरणानंतर एका वृत्तवाहिनीने घेतलेल्या जनमत चाचणीत नागरिकांनी 'कायद्याचा धाक नसणे' या पर्यायाला अधिक प्रमाणात मते दिली होती. पैसा, सामाजिक माध्यमे, स्वैराचार असे अन्य पर्यायही त्यात दिले होते. 'कायद्याचा धाक नसणे' या सूत्राकडे सरकार, प्रशासन आणि पोलीस यांनी गांभीर्याने पहायला हवे. हा धाक निर्माण करण्यासाठी, तसेच संवेदनशील समाजमन घडवण्यासाठी काय करायला हवे? यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. न्यायालयीन प्रक्रियेला होणाऱ्या विलंबातूनही अशा प्रवृत्ती बळावत नसतील कशावरून? त्यामुळे न्याययंत्रणाही अधिक सक्षम आणि तत्पर व्हायला हवी. 'गुन्हेगारांना निर्भय होऊ देण्याची संधी न्यायालयाने उपलब्ध करू नये', असे जनतेला वाटते. शिक्षा ही निश्चित आणि जलद गतीने व्हायला हवी. गुन्हेगारी पुरुषाप्रमाणे गुन्हेगारी स्त्रीला शिक्षा व्हायलाच हवी. जर पीडित स्त्रियांना न्याय मिळतो, तर पीडित पुरुषांनाही तो मिळायला हवा. संवेदनशीलता ही दोन्ही बाजूंसाठी असली पाहिजे. तसे झाल्यासच ती खरी समानता ठरेल. 'एकम न्याय फाऊंडेशन' या संस्थेने जून २०२६ मध्ये पत्नी आणि तिचा प्रियकर यांनी पतीची हत्या केल्याच्या देशभरातील ४२ घटना नोंदवल्या आहेत. ही आकडेवारी कदाचित अधिकही असू शकते. त्यामुळे या घटकांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. प्रसारमाध्यमांनीही अशा घटनांना प्रसिद्धी देतांना राष्ट्रीय विषय झाल्याप्रमाणे त्या जनतेसमोर वारंवार आणू नयेत. त्यावर नियंत्रण आणायला हवे. स्वकेंद्रित मानसिकतेतूनही कोणत्याही थराला जाण्याचे सध्याचे वाढते प्रकार पहाता देशाला नैतिक अधिष्ठानाची आवश्यकता आहे. हे नैतिक बळ धर्माचरण आणि ईश्वराची आराधना यांतूनच प्राप्त होऊ शकते. यासाठी प्रत्येक नागरिकाने प्रयत्न केल्यास सुसंस्कृत आणि न्यायनिष्ठ समाजाचा भक्कम पाया निर्माण होईल.

मुंबईकरांची भिस्त जुलैच्या पावसावर!



दरवर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात मुंबईकरांना दिलासा देणारा पाऊस यंदा २०२६ मध्ये कमालीचा लहरी ठरलाय. जून महिना संपत आला, तरी मुंबईला पाणीपुरवठा करणार्या धरणांमध्ये अपेक्षित जलसाठा जमा झालेला नाही. सद्यस्थितीत मुंबईसह महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमध्ये मान्सून सक्रिय झाला असला, तरी मान्सूनचा पुढील प्रवास आणि विशेषतः जुलै महिन्यात होर्णाया पावसावरच मुंबईची भिस्त असेल. जुलै महिन्यात समाधानकारक पाऊस न पडल्यास मुंबई महापालिकेकडून कृत्रिम पावसाचा पर्याय चाचपडून बघितला जाईल, असेही संकेत मिळत आहेत. तशी वेळ मुंबईकरांवर येऊ नये हीच अपेक्षा.

मे महिन्याच्या शेवटी केरळममध्ये दाखल होणारा मान्सून साधारणतः आठवडाभरात तळकोकणात येतो आणि तिथून पुढे सरकत 10 ते 11 जूनपर्यंत मुंबईत त्याचे दिमाखात आगमन होते. गेल्या अनेक दशकांचा इतिहास पाहिला तर काही अपवाद वगळता हा अंदाज तंतोतंत खरा ठरतो. मात्र, यंदाचा जून महिना मुंबईतील पावसाच्या इतिहासात एक मोठा अपवाद ठरलाय. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या (आयएमडी) नोंदीनुसार, 2026 मध्ये मान्सून आपल्या नेहमीच्या वेळेपेक्षा ३ दिवस उशिराने, म्हणजेच 4 जून 2026 रोजी केरळमच्या किनारपट्टीवर दाखल झाला. केरळमनंतर मान्सून साधारणपणे 7 ते 9 जूनदरम्यान महाराष्ट्राच्या वेशीवर म्हणजेच सिंधुदुर्ग-रत्नागिरीत धडकतो. त्यानुसार, यंदा मान्सून ९ जूनच्या सुमारास तळकोकणात दाखल झाला खरा, मात्र तिथे पोहोचताच त्याची प्रगती पूर्णपणे ठप्प झाली. मुंबई आणि उर्वरित महाराष्ट्राच्या दिशेने पुढे सरकण्यासाठी मान्सूनने तब्बल दोन आठवडे घेतले. तोपर्यंत तो महाराष्ट्राच्या वेशीवरच रेंगाळला होता. मान्सूनची ही प्रदीर्घ रेंगाळलेली वाटचाल गेल्या दोन दशकांतील सर्वात मोठी रखडपट्टी ठरली आहे. या रखडपट्टीला कारणीभूत ठरली ती पॅसिफिक महासागरातील अल निनोची परिस्थिती.

जूनच्या पहिल्या तीन आठवड्यात पावसाने ओढ दिल्याने मुंबईला पाणीपुरवठा करणार्या सातही धरणांमध्ये मिळून जेमतेम 8 टक्के जलसाठा शिल्लक राहिलाय. हे पाणी 20 ऑगस्टपर्यंत पुरेल इतकेच आहे. सध्या मुंबईत पिण्याच्या पाण्यात १० टक्के आणि व्यावसायिक कामांच्या पाण्यात 20 टक्के कपात सुरू आहे. इमारत बांधकामांचे पाणी आणि स्विमिंग पुलाचे पाणी बंद करण्यात आले आहे. तरीही धरणांतील पाणीसाठ्याने तळ गाठल्याने मुंबईकरांना राज्य सरकारच्या राखीव जलसाठ्यातून पाणी देण्याची वेळ मुंबई महापालिकेवर ओढावलीय. अनेक सोसायट्यांमध्ये पाण्याचे टँकर्स मागवावे लागत आहेत. मुंबईतील याच पाणी टंचाईच्या प्रश्नावर नुकतीच मुंबई महापालिका सभागृहात सुमारे 7 तास चर्चा झाली. या चर्चेत हळूहळू सक्रिय होत असलेला पाऊस जुलै महिन्यात चांगला बरसल्यास पाण्याची कमतरता भरून काढता येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. मात्र, जुलैतही पावसाने दगा दिल्यास कृत्रिम पावसाचा विचार करता येईल, अशी माहिती मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी सभागृहात दिली.

पावसाने ओढ दिल्यास किंवा धरण क्षेत्रातील पाणीसाठा नीचांकी पातळीवर आल्यास क्लाऊड सीडिंग किंवा कृत्रिम पावसाचा प्रयोग मैलाचा दगड ठरतो. आकाशात ढग असूनही जेव्हा पाऊस पडण्यायोग्य तापमान तयार होत नाही किंवा या ढगांमध्ये पाण्याच्या थेंबाचे प्रमाण कमी असते अशा वेळी क्लाऊड सीडिंगचा वापर केला जातो. कृत्रिम पाऊस पाडण्याची ही प्रक्रिया पूर्णपणे वैज्ञानिक असली, तरी तिला हवामानाचीही साथ लागते. म्हणजे क्लाऊड सीडिंगसाठी आकाशात बाष्पयुक्त ढगांची उपस्थिती असणे अनिवार्य असते. कोरड्या आकाशात पाऊस पाडणे कुठल्याही तंत्रज्ञानालाही शक्य नाही. या बाष्पयुक्त ढगांची उंची किमान 1 ते 2 किलोमीटर असावी लागते आणि त्यात पाण्याचे प्रमाण पुरेसे (आर्द्रता) असावे लागते. वार्याचा वेगही मर्यादित असावा लागतो. वारा जास्त असेल तर ढगांवर फवारलेली रसायने वाहून जात भलतीकडेच पाऊस पडण्याची शक्यता असते. क्लाऊड सीडिंगमध्ये विशेष विमान, हेलिकॉप्टर्स किंवा जमिनीवरील जनरेटरच्या सहाय्याने आकाशातील ढगांवर ठराविक रसायनांची फवारणी केली जाते. थंड ढगांवर सिल्व्हर आयोडाईड किंवा ड्राय आईस फवारला जातो. तर कोमट ढगांवर सोडियम क्लोराईड (साधे मीठ) किंवा कॅल्शियम क्लोराईड फवारले जाते. ही रसायने ढगांमधील जलबाष्पाला आकर्षित करतात. त्यामुळे पाण्याचे बारीक कण एकत्र येऊन त्यांचे मोठ्या आणि जड थेंबांमध्ये रूपांतर होते. सरतेशेवटी, हे थेंब गुरुत्वाकर्षणामुळे पावसाच्या स्वरूपात जमिनीवर कोसळतात. पिण्याच्या पाण्यासह हवेची गुणवत्ता अत्यंत खालावते, तेव्हा हवेतील धुलीकण खाली बसवण्यासाठीदेखील कृत्रिम पावसाचा प्रयोग केला जातो.

नाही म्हटले तरी, मुंबई आणि आसपासच्या परिसरात गेल्या 50 वर्षांत दोन ते तीन वेळा कृत्रिम पावसाचे प्रयोग करण्यात आलेले आहेत. 1973 ते 1979 दरम्यान इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजीने (आयआयटीएम) मुंबई आणि पश्चिम घाट परिसरात मान्सून वाढवण्यासाठी काही वैज्ञानिक प्रयोग केले होते. यानंतर थेट 2009 मध्ये मुंबईला पाणीपुरवठा करणार्या तलावांतील पाणी आटल्यामुळे कृत्रिम पावसाचे प्रयोग झाले होते. या प्रयोगासाठी मुंबई महानगरपालिकेने एका अमेरिकन कंपनीच्या सहाय्याने विमानाद्वारे मोडक सागर आणि तानसा धरण क्षेत्रातील ढगांवर सीडिंग केले होते. हा प्रयोग फार यशस्वी ठरला नव्हता. कारण ज्या दिवशी ढगांवर फवारणी झाली, त्यापुढील काही दिवसांत अत्यंत कमी किंवा नगण्य पाऊस पडला. शास्त्रज्ञांच्या मते, नैसर्गिक ढग आधीच कमी असल्याने रसायनांचा फारसा परिणाम झाला नाही. त्यामुळे महापालिकेने 12-13 कोटी रुपये खर्च करूनही मुंबईच्या तलावांमधील पाणी साठ्यात लक्षणीय वाढ झाली नव्हती. यानंतर राज्य सरकारने 2015 मध्ये मराठवाड्यात 27 कोटी आणि 2019 मध्ये 30 कोटी रुपये खर्च करून कृत्रिम पावसाचे प्रयोग केले होते, पण ते मुख्यत्वे मुंबईबाहेर दुष्काळी भागासाठी होते. हे प्रयोगही फारसे परिणामकारक ठरले नाहीत. नोव्हेंबर-डिसेंबर 2023 मध्ये मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावल्याने धुलीकण कमी करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार महापालिकेने पुन्हा कृत्रिम पावसाची तयारी केली होती. एका उड्डाणाचा खर्च सुमारे 40 ते 50 लाख रुपये अपेक्षित धरला गेला होता, मात्र यासाठी आवश्यक असणारे ढग आणि हवामान न मिळाल्याने हा प्रयोग प्रत्यक्ष पूर्ण होऊ शकला नाही.

जागतिक स्तरावर दुबई किंवा चीनमध्ये हा प्रयोग यशस्वी ठरत असला, तरी भारतात मान्सूनच्या काळात हवामान वेगाने बदलत असल्याने कृत्रिम पावसाच्या यशाचा दर 40 टक्के ते 50 टक्क्यांच्या आसपासच राहिला आहे. अनेकदा कृत्रिम पावसामुळे पाऊस पडला की तो नैसर्गिक बदलांमुळे पडला, हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध करणेही कठीण जाते. संकटसमयी जल व्यवस्थापनासाठी हे तंत्रज्ञान आशेचा किरण ठरत असले, तरी हा प्रयोग अत्यंत खर्चिकही असतो. यासाठी विविध हवामानशास्त्रीय परवानग्यांची आवश्यकता असते. त्यातही वर नमूद केल्यानुसार सक्सेस रेट फारच कमी असतो. कसे का असेना मागच्या दोन दिवसांपासून अरबी समुद्रात झालेल्या वातावरणातील बदलामुळे मान्सूनची कोंडी फुटली आहे. असह्य उकाडा, घामाच्या धारा आणि 57 वर्षांतील सर्वाधिक उष्ण जून महिन्याचा सामना केल्यानंतर, अखेर मुंबापुरीत मान्सूनचा पाऊस अधिकृतपणे सक्रिय झाल्याचे म्हटले जात आहे. गेल्या काही आठवड्यांपासून चातकासारखी पावसाची वाट पाहर्णाया मुंबईकरांना आकाशात जमा झालेले काळेभोर ढग आणि कोसळणाऱ्या टपोऱ्या थेंबांनी सुखद धक्का दिला आहे.

सामान्यतः जून महिन्यात मुंबईत सरासरी 500 हून अधिक मिलीमीटर पाऊस पडतो. मात्र, यंदा जूनच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत मुंबईने सरासरीच्या 90 टक्क्यांपेक्षा जास्त तूट अनुभवली आहे. दक्षिणेकडील राज्यांमध्ये जूनच्या सुरुवातीला 30 टक्के ते 35 टक्क्यांची मोठी तूट होती, परंतु दक्षिण द्वीपकल्पात पावसाचा जोर वाढल्याने ही तूट वेगाने भरून निघत आहे. त्याचप्रमाणे मुंबईतील पावसाची एकूण आकडेवारी 50 मिलीमीटरच्या आसपास रेंगाळत असली, तरी अरबी समुद्रात निर्माण झालेल्या चक्राकार प्रणालीमुळे पावसाचा जोर वाढण्याचे संकेत मिळत आहेत.


पावसाच्या पहिल्या सरी कोसळताच मुंबईतील हवेत एका रात्रीत बदल झाला असून वातावरणात गारवा पसरायला सुरुवात झाली आहे. कपाटात वेटिंग लिस्टवर असलेले रेनकोट आणि छत्र्या आता मानाने बाहेर निघाल्या आहेत. पावसाचा जोर वाढताच हातात वाफाळता चहाचा कप आणि सोबतीला गरमागरम कांदा भजी, बटाटा वडा खाण्याचा मोह मुंबईकरांना होऊ लागला आहे. फक्त एकच की जुलै महिन्यात मान्सूनची वाटचाल दमदार व्हावी. मुंबईच्या धरण क्षेत्रांमध्ये बरसून पावसाने सगळी तूट भरून काढावी, जेणेकरून मुंबईवरील जलसंकट पूर्णपणे दूर होऊन मुंबईकरांवर कृत्रिम पाऊस पाडण्याची वेळ येणार नाही आणि मुंबईकरांना पावसाच्या सरींचा मनमुराद आनंद लुटता येईल.

सत्ता बदलूनही मुंबईची तुंबईच

तब्बल तीन आठवडे ओढ दिल्यानंतर मेघगर्जनेसह राज्यभरात दाखल झालेल्या पावसाने रखरखत्या उन्हातून सर्वांची सुटका केली, परंतु हा आनंद मुंबईकरांच्या चेहऱ्यावर फार काळ टिकू शकला नाही. याचे कारण म्हणजे पहिल्याच दमदार पावसाने नेहमीप्रमाणे मुंबईची अक्षरशः तुंबई करून टाकली. मुंबई शहर आणि उपनगरात अंदाजे २०० ते ३०० मिमीदरम्यान पडलेल्या पावसाने मुंबई महापालिकेचे नालेसफाई आणि मान्सूनपूर्व तयारीचे सर्व दावे वाहून गेले. शहरातील हिंदमाता, किंग्जसर्कल, सायन आणि उपनगरातील कुर्ला, चेंबूर, मानखुर्द, बोरिवली, कांदिवली, मालाड, अंधेरी या सखल भागांत दरवर्षीप्रमाणे पाणी साचले. मिलन, अंधेरी आणि मालाड सब-वे पाण्याखाली गेल्याने वाहतूक काही तासांसाठी पूर्णपणे ठप्प झाली होती. जागोजागी रस्त्यांवर आणि रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने मुंबईकरांचे प्रचंड हाल झाले. या सगळ्या परिस्थितीला केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणता येणार नाही, कारण या तुंबलेल्या पाण्यासोबतच मुंबईच्या राजकारणातील दुटप्पीपणाचे पाणीही आता चव्हाट्यावर आले आहे. गेली अडीच-तीन दशके मुंबई महापालिकेवर शिवसेनेची एकहाती सत्ता होती. त्या काळात जेव्हा जेव्हा मुंबईत पावसाळ्यात पाणी तुंबायचे, तेव्हा तेव्हा आज सत्तेत असलेला भाजप आणि त्यांचे नेते शिवसेनेवर भ्रष्टाचारासह निष्काळजीपणाचे आरोप करत तुटून पडायचे. मुंबईला भ्रष्टाचाराने पोखरले, नालेसफाईच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचे आरोप भाजपकडून व्हायचे. पण आता मुंबई महापालिकेतील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. प्रशासक राजवटीनंतर झालेल्या निवडणुकीनंतर मुंबई महापालिकेचा कारभार भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या थेट नियंत्रणात आला आहे. असे असूनही पहिल्याच पावसात मुंबईची जी दुरवस्था झाली त्यावरून हेच म्हणावे लागेल की सत्ता बदलली, नेते बदलले, पण मुंबईकरांचे भाग्य काही बदलले नाही. सत्तेत नसताना महापालिकेच्या प्रत्येक चुकीसाठी शिवसेनेला जबाबदार धरणारे भाजप नेते आज स्वतः सत्तेत आल्यावर मात्र वेगळीच भाषा बोलू लागले आहेत. कालच्या पाणी तुंबण्यावर सारवासारव करताना संपूर्ण मुंबईच खोलगट भागात असून भौगोलिक रचनेमुळे इथे पाणी तुंबणारच, असा दावा भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी केला. तर तुंबलेल्या परिसरातून तात्काळ पाण्याचा निचरा झाल्याचे मुंबईच्या महापौर रितू तावडे म्हणाल्या. मात्र, तेव्हाचे पाणी तुंबणे हा जर शिवसेनेचा भ्रष्टाचार होता, तर आजचे पाणी तुंबणे हे भाजपचे अपयश का मानले जाऊ नये? सत्तेत येताच भाजपच्या नेत्यांचे विज्ञान आणि भौगोलिक ज्ञान वाढले की काय? महापालिकेवर कोणाचेही नियंत्रण असो, मुंबईच्या सखल भागांची अवस्था बदललेली नाही, हेच तेवढे सत्य. हिंदमाता आणि किंग्ज सर्कलमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या भूमिगत पाण्याच्या टाक्या पहिल्याच २०० मिमी पावसात अपुऱ्या पडल्या. अंधेरी आणि मिलन सबवे ५ ते ६ फूट पाण्याखाली कशामुळे गेले? खरे तर सत्ताधारी भाजप आणि महापालिका प्रशासनाने उघडपणे आपल्या अपयशाची कबुली द्यायला हवी. केवळ पोकळ दावे करून किंवा विरोधी पक्षांवर टीका करून मुंबईसारख्या जागतिक दर्जाच्या शहराच्या पायाभूत सुविधा सुधारता येणार नाहीत. मे महिन्यात महापौर, उपमहापौरांसह मुंबई भाजपचे अध्यक्ष व सर्वच नेते मुंबई शहर, उपनगराचे दौरे करून नालेसफाई कामाची पाहणी करत होते. यंदा मुंबई तुंबणार नाही, असे दावे करत होते. त्यांच्या दाव्यानुसार नालेसफाई योग्य पद्धतीने झाली होती, तर २४ तासांत नाले तुंबले कसे? खरे तर हे आहे की शहर-उपनगरातील असंख्य नाले आणि गटारांमधील गाळ उपसलाच गेला नाही. वेळोवेळी माध्यमांमध्ये प्रकाशित झालेले फोटो, व्हिडिओतून नालेसफाईच्या कामांचा फोलपणा आधीच उघड झालेला आहे. मुंबईकर दरवर्षी प्रामाणिकपणे हजारो कोटी रुपयांचा कर भरतात. या कराच्या बदल्यात त्यांना पहिल्याच पावसात पाण्यात तुंबलेली मुंबई, वाहतूक कोंडी आणि विस्कळीत झालेली लोकल सेवा मिळत असेल, तर हे प्रशासनाचे आणि सत्तेत बसलेल्यांचे शंभर टक्के अपयश आहे. पहिल्याच पावसाने हेदेखील स्पष्ट केले आहे की मुंबईकरांच्या समस्यांशी राजकीय पक्षांना काहीही देणेघेणे नाही. सत्ता कोणाचीही असो, सामान्य जनतेला मात्र त्याच त्रासातून जावे लागते. पूर्वीच्या सत्ताधार्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप करून सत्तेची खुर्ची मिळवणाऱ्या भाजपने आता पळवाट न शोधता या अपयशाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आपण सत्तेत आहोत याचे भान ठेवत मुंबईकरांच्या समस्या ओळखून त्या सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सध्या अल निनोच्या प्रभावामुळे पहिल्या दणक्यानंतर पावसाने पुन्हा विसावा घेतला आहे. अशा वेळी आवश्यक त्या सखल परिसरात अधिकाधिक पाणी उपसा पंप लावणे, तुंबलेल्या नाल्यातून घाण बाहेर काढून पाण्याचा निचरा व्हावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मुंबईला जर खरोखरच स्मार्ट सिटी किंवा जागतिक दजार्चे शहर बनवायचे असेल, तर केवळ कागदावर नालेसफाईचे आकडे दाखवणे बंद करावे लागेल. ड्रेनेज सिस्टीमचे आधुनिकीकरण, पाणी उपसर्णाया पंपांची योग्य व्यवस्था, पायाभूत सुविधांवर युद्धपातळीवर काम करावे लागेल. अन्यथा, सत्ता बदलत राहील, पण मुंबईची 'तुंबई' होण्याची परंपरा कधीच संपणार नाही.

सौरभ, राजा, केतन... अजून किती?

मुलंमुली एकसमान नारा देत आपणच मुलींना पुरुषी बनवतोय. बेटी बचाओ बेटी पढाओ या नादात पोर पोरी बिथरत चाललेत. हर महिला बेचारी नही आणि हर पुरुष अत्याचारी नही, असं सांगण्याची वेळ आली आहे. महिलांसाठी न्याय मागता मागता आता पुरुषांसाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. आज महिलांमध्ये दडलेल्या या विकृतीमुळे सौरभ, राजा, केतन यांसारख्या निरागस तरुणांना जीव गमवावा लागतोय.



पुण्यातील केतन अग्रवाल हत्या प्रकरणाने सगळा देशच सुन्न आहे. या घटनेत निरागस केतनचा गेलेला जीव काळजाला भिडणारा आहे. तर या घटनेनंतर आजवर फक्त महिला अत्याचारावर आवाज उठवणाऱ्यांचे मौन चिंतेचा विषय आहे. दुसरीकडे या घटनांवर सोशल मीडियावर तरुणाईचा सुरू असलेला मिश्र प्रतिक्रियांचा पाऊस मन विषण्ण करणारा आणि नव्या संवेदनहीन खुनशी समाजाची निर्मिती होत असल्याचा इशारा देणारा आहे. पण केतन अग्रवाल हत्या प्रकरणाचा मागोवा घेणंही महत्त्वाचं आहे. पुण्यातील बिजनेसमन विशाल अग्रवाल यांचा मुलगा केतन याचे लग्न त्यांच्याच नात्यातील सिया गोयल या तरुणीबरोबर ठरले. दोन्ही कुटुंब आर्थिकदृष्ट्या संपन्न आणि हायफाय असल्याने लग्नही त्याच तोडीस तोड व्हावे यासाठी १७ कोटी रुपयात जयपूरमधील पॅलेस बुक करण्यात आला. दोन्ही कुटुंबांच्या पाहुण्यांच्या सोयीसाठी दोन विमानंही बुक करण्यात आली.

नोव्हेंबरमध्ये हा शाही लग्नसोहळा पार पडणार असल्याने दोन्ही कुटुंब उत्साहात होती. केतनही आनंदात होता. कारण दोघेही नात्यातील असल्याने दोन्ही कुटुंब आणि केतन सियादेखील आधीपासूनच एकमेकांना ओळखत होते. फेब्रुवारीत दोघांचा साखरपुडाही दणक्यात झाला. सियाने त्याचे फोटो, व्हिडिओ सोशल मीडियावर टाकत आपण केतनबरोबर किती आनंदात आहोत हे जगाला दाखवलं. ती त्या दोघांमधील प्रत्येक लहान सहान गोष्टींचे व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर टाकत केतनबरोबर हॅप्पी असल्याचं दाखवत होती. पण दुसरीकडे ती केतनबरोबर सतत वाद घालत होती. यामुळे केतनही कन्फ्युज होता. तिच्या चिडचिड आणि रागाचे कारण त्यालाही कळत नव्हते. त्यामुळे त्याने पालकांना सियाची नीट चौकशी केली आहे का? असेही अनेकदा विचारले. यावर घरच्यांनी तिच्या कुटुंबाबरोबर ३५ वर्षांचे संबंध आहेत. सगळं चांगलं आहे सांगत केतनच्या मनातल्या किंतुला शांत केलं होतं. त्यामुळे सियाच्या तासनतास सतत बिझी असलेल्या फोनवरही केतनला कधी संशय आला नाही. तो फक्त कुटुंबावर विश्वास ठेवून भावी पत्नी म्हणून सियावर प्रेमाचा वर्षाव करत राहिला.

तिच्या वाढदिवसासाठी अख्खं हॉटेल बुक करणारा, तिच्यावर फुलांचा वर्षाव करून तिला खूश पाहून आनंद मानणारा केतन खरं तर चांगला पती झाला असता. पण सियाचे चेतन नावाच्या तरुणावर प्रेम होते. तिला मुळी हे लग्नच करायचे नव्हते. केवळ कुटुंबाच्या दबावामुळे तिने लग्नास होकार दिला होता. पण हे सगळे सियाने १८ जूनला स्वतःच्या वाढदिवसाच्या दिनी चेतनच्या मदतीने केतनचा लोहगडावरून ढकलून खून केल्यानंतर पुढे आलेलं सत्य आहे. कदाचित हे कृत्य करण्यापेक्षा तिने आधीच केतनला विश्वासात घेऊन लग्नास नकार असल्याचे सांगितले असते तर केतननेही त्यातून मार्ग काढला असता. तिची मदत केली असती. ते असेही एकमेकांच्या परिचयातलेच होते. कारण केतन बऱ्यापैकी समजदार असल्याचे अनेकांनी सांगितले आहे. पण या सगळ्या जर तरच्या गोष्टी आहेत. जे घडायचं ते घडून गेलंय. केतन आज जगात नाही. सिया आणि चेतनला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्यांच्यावर कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. यातून नेमकं काय बाहेर येणार? सिया चेतनला शिक्षा होणार की बेल मिळणार? याची उत्तरं मिळतीलच, पण याचे पडसाद जे समाजात उमटत आहेत ते समाजाचा पाया हलवणारे आहेतच, पण पालकांनाही हादरा देणारे आहेत.

काहींनी यात सियाचे समर्थन केले आहे. आपल्या पुरुषसत्ताक देशात महिलांवर कायम अत्याचार होत आहेत. स्त्रियांच्या भावनांचा विचार न करता, तिच्या विचारांना महत्त्व न देता तिच्या लग्नाचा निर्णय घेतला जातो. पुढे जाऊन त्याचे गंभीर परिणाम तिच्या जीवनावर होतात. असा दावा करत अनेकजण सिया फक्त २० वर्षांची मुलगी आहे, असे सांगत तिला पाठिंबा देत आहेत. तर अशाप्रकारे प्रियकराच्या मदतीने पतीला ठार करणार्या महिला गुन्हेगारांच्या यादीत सियाच्या नावाचीही नोंद झाली आहे. प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या करून त्याच्या शरीराचे तुकडे निळ्या ड्रममध्ये भरणारी मुस्कान, तर लग्नानंतर हनिमूनसाठी मेघालयाला गेल्यावर पतीला मित्रांच्या मदतीने कड्यावरून खाली ढकलून त्याची हत्या करणारी सोनम रघुवंशी आणि सिया यात कमालीचे साम्य आहे. दोन्ही कुटुंब बिझनेसवाली आहेत. त्यामुळे पैशांसाठी या हत्या झालेल्या नाहीत. तर केवळ प्रेमाच्या त्रिकोणातून झालेल्या आहेत.

उत्तर प्रदेशातील सौरभची हत्या त्याची पत्नी मुस्कान हिने प्रियकराच्या मदतीने केली. सौरभला मद्य पाजून त्याच्या छातीत, पोटात सुऱ्याने सपासप वार करून मुस्कान आणि तिच्या प्रियकराने त्याची निर्घृण हत्या केली. नंतर मृतदेहाचे तुकडे निळ्या ड्रमात भरून त्यात सिमेंट टाकून फेकण्यात आला. पण सौरभच्या कुटुंबाला संशय आला आणि सत्य समोर आले. या घटनांची नोंद मीडियाने घेतल्यानेच त्याची सरकारने दखल घेतली. पण आज अशा अनेक घटना आपल्या आजूबाजूला घडत आहेत. ज्यात महिलांकडून सुसंस्कृत घरातील मुलांचं आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. मुलांना ठार केलं जात आहे. कायद्याच्या बळाचा गैरवापर करत अनेक विवाहित पुरुषांचा पत्नीकडून छळ होत आहे. याला कंटाळून आत्महत्या करणाऱ्यांमध्ये भारतीय पुरुषांचा क्रमांक प्रथम आहे. यात ८२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. पण केवळ पुरुष असल्याने त्यांच्याकडे दुर्लक्ष करून फक्त महिला अत्याचाराच्या घटनांना रंगवणं आता बंद करायला हवं. जेव्हा या असुरी वृत्तीला कायद्याचं बळ मिळतं तेव्हा ते त्या एकट्या व्यक्तीला मिळत नसतं तर त्यातून हजारो लाखो असुरी व्यक्ती घडतात.

कायदा आपलं काहीच करू शकत नाही याचा विश्वास नव्हे खात्रीच असल्याने आज अशा अनेक केसेसमध्ये महिलांना कठोर शिक्षा झाल्याचे ऐकिवात व वाचनात नाही. त्यामुळेच मुस्कान, सोनम, सिया यासारख्या असंख्य तरुणी आज संस्कार, संवेदना, नातं, भावना यांना तिलांजली वाहत पुरुषांचे मुडदे पाडत सुटल्या आहेत. एकीचं बघून दुसरीला बळ मिळतंय. समाजात असंतोष वाढलाय. कोणत्याही गुन्ह्यात स्त्री पुरुषांना वेगवेगळा न्याय मिळता कामा नये. राजाची हत्या करणाऱ्या सोनमला बेल मिळाली त्यामुळेच सियासारख्या तरुणींची पतीला ठार मारण्याची हिंमत होतेय, असा आरोप राजाच्या आईनेच केला आहे. जो शंभर टक्के खरा आहे. कारण आपण काहीही केलं तरी कायदा आपल्याच बाजूने असल्याचा फाजील विश्वास महिलांना आलाय. कौटुंबिक हिंसाचारविरोधी कायद्याचाही असाच गैरवापर होत आहे. पतीला वेठीस धरून त्याच्याकडून पैसे उकळून बॉय फ्रेंडबरोबर एन्जॉय करण्याचा प्लान आखूनच अनेक तरुणी धनाढ्य मुलांना जाळ्यात अडकवत आहेत. घटस्फोटाच्या केसेसमध्ये त्यांचा हा खरा चेहरा बघून न्यायालयही विचारात पडू लागले आहे. लग्न या पवित्र विवाह संस्थेचे बदलते हे रुप समाजासाठीच नाही तर तुमच्या आमच्या मुलांसाठीही घातक आहे.

विशेष म्हणजे या सगळ्या घटनांमध्ये आरोपी असलेल्या तरुणतरुणी तिशीच्या आतील आहेत. जेन झी आहेत. आत्मकेंद्रित असल्याने समोरच्यांचा विचार करण्याची वृत्तीच यांच्यात कधी विकसित झालेली नाही. किंबहुना पालकांनी त्यांना तसंच घडवलंय. पैशाने जग जिंकता येतं हे या धनाढ्य घरातील लेकीबाळींनी डोक्यात ठेवलंय. सुखी आयुष्य म्हणजे खिशात बक्कळ पैसा, ड्रग्ज, पार्ट्या, सेक्स, फॉरेन ट्रीप असा समज असलेली पिढी आपण वाढवतोय. मुलं मुली एकसमान नारा देत आपणच मुलींना पुरुषी बनवतोय. बेटी बचाओ बेटी पढाओ या नादात पोर पोरी बिथरत चाललेत. हर महिला बेचारी नही आणि हर पुरुष अत्याचारी नही, असं सांगण्याची वेळ आली आहे. महिलांसाठी न्याय मागता मागता आता पुरुषांसाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. आज महिलांमध्ये दडलेल्या या विकृतीमुळे राजा, सौरभ, केतन यांना जीव गमवावा लागलाय. यामुळे बिघडलेल्या मुलींना सुधरवण्यासाठी त्यांचे लग्न लावून दुसऱ्याच्या घरातले दीपक न विझवता आपल्या मुलींना सुधरवण्याचे आव्हान पालकांपुढे आहे. नकोतेवढं स्वातंत्र्य देऊन आपण मुलामुलींना बिघडवतोय की सुधरवतोय हे पालकांनी वेळीच ओळखायची वेळ आली आहे. अन्याय मग तो स्त्रीवर झालेला असो वा पुरुषावर पीडितांच्या बाजूने उभे राहणे हे कायदा जिवंत असल्याचं लक्षण आहे. फक्त यात स्त्री-पुरुष भेद येता कामा नये, यातही एकसमानता असायली हवीच. तरच समाज

या घरगुती उपचारांनी केस बनवा चमकदार



वर्षातील प्रत्येक बदलत्या ऋतूमध्ये केसांची देखभाल करण्याची पद्धत देखील बदलावी लागते. उन्हाळा असो किंवा पावसाळा, प्रत्येक ऋतूमध्ये आपल्या केसांची निगा घ्यायला हवी. त्याकरिता आपण सर्वच जण आपापल्या परीने प्रयत्न करत असतो. कधी महागडे शाम्पू वापरून, तर कधी ब्यूटी पार्लरमधील महागड्या हेअर स्पा ट्रीटमेंट घेऊन, तर कधी परंपरेने चालत आलेले उपाय अमलात आणून, आपण आपल्या केसांची योग्य निगा राखण्याचा प्रयत्न करत असतो. पण आजकाल बदलते हवामान, प्रदूषण, केसांसाठी वापरली जाणारी रसायनयुक्त प्रसाधने वापरल्याने केस अकाली पांढरे होणे, गळणे इत्यादी तक्रारी उद्भवतात. या तक्रारी दूर करण्यासाठी आणि केस नेहमी सुंदर आणि चमकदार दिसण्यासाठी काही घरगुती उपाय करून बघता येतील.



कांद्याचा रस : कांद्याच्या रसामध्ये सल्फर मोठ्या प्रमाणात असते. सल्फरमुळे कोलाजेन वाढून केसांची वाढ चांगली होण्यास मदत मिळते. हा उपाय करण्याकरता एक कांदा किसून तो पिळून घ्यावा. हा रस दहा मिनिटे केसांच्या मुळांशी लावून ठेवावा. त्यानंतर केस कोमट पाण्याने आणि शाम्पूने स्वच्छ धुवावेत. कांद्याच्या रसाचा वास केसांमधून निघाला नाही, असे वाटत असल्यास पुन्हा एकदा हलका शाम्पू वापरावा. कांद्याच्या रसाप्रमाणेच बटाट्याचा रसही केसांसाठी चांगला आहे. बटाटा किसून घेऊन पिळून घ्यावा आणि तो रस केसांना लावावा. दहा मिनिटांनी केस धुऊन टाकावेत.

नारळाचे दूध : नारळाच्या दुधामध्ये लोह, पोटॅशियम आणि फॅट्सची मात्र असते. या तीनही गोष्टी केसांसाठी अतिशय उत्तम आहेत. मात्र केसांना लावण्यासाठी ताजा नारळ खवून त्याचे दूध काढून घ्यावे. बाजारातून आणलेले तयार नारळाचे दूध शक्यतो वापरू नये. नारळाच्या दुधामध्ये अर्ध्या लिंबाचा रस घालावा आणि तीन-चार थेंब लॅव्हेंडरचे तेल घालावे. हे मिश्रण चार ते पाच तासांसाठी केसांना लावून ठेवावे. त्यानंतर कोमट पाण्याने आणि शाम्पूने केस धुवावेत.

आवळा : आवळा केसांकरिता अतिशय फायदेशीर आहे. यामध्ये असलेले 'क' जीवनसत्त्व केसांच्या आरोग्याकरिता अतिशय लाभकारी आहे. केसांना लावण्याकरिता आवळ्याचे तुकडे करून ते वाळवावेत, आणि त्याची पूड करावी. आवळ्याची तयार पूड बाजारातही उपलब्ध आहे, तिचाही वापर करता येईल. दोन लहान चमचे आवळ्याची पूड घेऊन त्यामध्ये दोन चमचे लिंबाचा रस घालावा. हे मिश्रण केसांना लावावे, व ते वाळेपर्यंत केसांवर राहू द्यावे. त्यानंतर शाम्पू आणि कोमट पाणी वापरून केस धुवावेत.



ॲपल सायडर व्हिनेगर : ॲपल सायडर व्हिनेगरमुळे केसांचा PH स्तर नियंत्रित राहतो. जर केस लांब असतील, तर एक लिटर पाण्यामध्ये ७५ मिलीलिटर ॲपल सायडर व्हिनेगर घालावे आणि केस लहान असतील, तर एक कप कोमट पाण्यामध्ये १५ मिलीलिटर सायडर व्हिनेगर घालावे. शाम्पूने केस धुतल्यानंतर सगळ्यात शेवटी या पाण्याने केस धुवावेत. यामुळे केस चमकदार होतीलच, शिवाय केसांची लांबी वाढण्यासही मदत होईल.

अंड्यातील पांढरा भाग : अंड्यातील पांढरा भाग केसांसाठी लाभकारी असतो. यामध्ये प्रथिने, सल्फर, लोह, झिंक, सेलेनियम, आयोडीन आणि फॉस्फरस असल्याने केसांच्या वाढीकरिता याचा चांगला उपयोग होतो. अंड्यातील पांढरा भाग एका भांड्यामध्ये काढून चांगला फेटून घ्यावा. यामध्ये एक लहान चमचा ऑलिव्ह ऑईल घालावे. ऑलिव्ह ऑईलऐवजी ग्रेपसीड ऑईल किंवा लॅव्हेंडर ऑईलही वापरता येईल. या मिश्रणामध्ये एक लहान चमचा मध घालून हे मिश्रण चांगले फेटून घ्यावे आणि आपल्या केसांना वीस मिनिटे लावून ठेवावे. त्यानंतर थंड पाण्याने व शाम्पूने केस धुवावेत. अंड्यातील पांढरा भाग केसांसाठीच नाही, तर त्वचेसाठी देखील अतिशय चांगला आहे.

मेथी : मेथीचे दाणे किंवा मेथ्या केसांचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवण्यास मदत करतात. यामध्ये असलेली प्रथिने आणि निकोटिनिक ॲसिड केसांकरिता अतिशय फायदेशीर आहेत. मेथी दाणे केसांकरिता वापरण्यासाठी मेथी दाणे काही तास थोड्याशा पाण्यामध्ये भिजवून ठेवावेत. पाण्यामध्ये ठेवल्याने मेथी दाणे फुगतात. त्यानंतर हे मेथी दाणे मिक्सरवर वाटू घेऊन त्याची पेस्ट बनवून घ्यावी. या पेस्टमध्ये थोडेसे खोबरेल तेल मिसळावे आणि हे मिश्रण केसांना अर्धा तास लावून ठेवावे. त्यानंतर केस शाम्पूने धुऊन टाकावेत. मेथी दाण्यांमुळे केसांचे आरोग्य आणि नैसर्गिक रंग टिकून राहण्यास मदत मिळते.

ग्रीन टी : आपले आरोग्य सांभाळण्याकरिता आपण ग्रीन टीचा वापर करत असतो. हा ग्रीन टी आपल्या एकंदर आरोग्याकरताच नव्हे, तर केसांकरताही चांगला आहे. ग्रीन टीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मुबलक मात्रेमध्ये असतात. यामुळे केस चमकदार तर होतीलच, शिवाय केसांच्य मुळांना पोषण मिळून केस गळण्याचे प्रमाणही कमी होते. ग्रीन टी केसांकरता वापरण्यासाठी ग्रीन टी कोमट करून केसांना तासभर लावून ठेवावे. त्यानंतर थंड पाण्याने केस धुऊन टाकावेत.

अळशीचे सात आरोग्यदायी फायदे



पूर्वीपासूनच आहारात अळशीचा समावेश करण्याची आपली परंपरा आहे. अळशीत व्हिटॅमिन बी १, प्रोटीन, मॅग्नेशियम, ओमेगा-३ फॅटी ॲसिड ही पोषकतत्त्वे मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे आरोग्यास काय फायदा होतो जाणून घेऊया...

- अळशीमध्ये ओमेगा फॅटी ॲसिड आणि फायबर्स भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे मधुमेह, कॅन्सर आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो.
- अळशीच्या सेवनाने ब्रेस्ट कॅन्सर आणि कोलोरेक्टल कॅन्सर होण्याची संभावना कमी होते. अळशीत ओमेगा-३ फॅटी ॲसिड मुबलक प्रमाणात असल्याने ट्युमर होण्यापासून आणि वाढण्यापासून संरक्षण होते.
- अळशीच्या सेवनाने कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते. लावा स्टेट युनिव्हर्सिटीच्या न्यूट्रीशन डिपार्टमेंट रिसर्चनुसार असे सिद्ध झाले आहे की, शरीरातील कोलेस्ट्रॉलची मात्रा कमी करण्यासाठी अळशी उपयुक्त ठरते.
- मासिक पाळीत होणाऱ्या त्रासावर अळशी फायदेशीर ठरते.
- अळशीमुळे ब्लड शुगर नियंत्रित राहते.
- अळशीमुळे वजन नियंत्रित राहण्यास मदत होते.
- अळशीमुळे बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते.

बागेतले औषध
गवती चहा

आले आणि गवती चहा घालून केलेला चहा अनेक छोट्या-मोठ्या तक्रारींवरचा रामबाण उपाय आहे. सर्दी, डोकेदुखी, अंगातली बारीक कणकण घालवण्यासाठी हा सर्वोत्तम उपाय म्हणावा लागेल. गवती चहाला पातीचा चहा असेदेखील म्हणतात. याला एक विशिष्ट सुगंध असतो. घाम येऊन तापाचा निचरा होण्यासाठी गवती चहा विशेष गुणकारी आहे. गवती चहा, सुंठ, मिरे आणि दालचिनी यांचा अष्टमांश काढा घेतल्याने सर्दी-पडसे, थंडी वाजून ताप येणे आदी विकार नाहीसे होतात. तापात घाम येण्यासाठी गवती चहाचा वाफारा दिला जातो. हा वाफारा घेतल्यास ताप झटक्यात कमी होतो आणि अंगदुखी थांबते. गवती चहापासून तेलही काढतात. हे तेल संधिवात आणि वाताने अंग दुखण्यावर अत्यंत गुणकारी आहे. हे दुखणे असणाऱ्या व्यक्तींनी सकाळ-संध्याकाळ गवती चहाच्या तेलाने मालीश केल्यास संधिवात बरा होतो, अंगदुखी थांबते. गवती चहा कॉलराचा प्रतिबंध करण्यासाठीदेखील वापरला जातो.



प्रसन्न राहण्यासाठी करा 'हे' उपाय

अनेक जण दैनंदिन कामांमुळे थकून जातात. या थकव्यावर नेमका काय उपाय करावा हे न कळल्याने मग हा त्रास अंगावर काढला जातो. पण रोजची कामे करताना प्रसन्न राहणे शक्य आहे. त्यासाठी काही गोष्टींत नियमितता ठेवल्यास हे नक्कीच साध्य होऊ शकते. वजन कमी करणे, ताकद वाढवणे, शरीराची लवचिकता वाढवणे, त्वचा टवटवीत ठेवणे, त्याचबरोबर मन प्रसन्न ठेवणे व आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज आहे. दिवसातील सर्वाधिक काळ घराबाहेर असल्याने आपण ताजेतवाने राहण्यासाठी योग, प्राणायाम आणि ध्यान यांची नक्कीच मदत घेऊ शकतो. योग या गोष्टीकडे आजही फक्त व्यायाम प्रकार म्हणून पाहिले जाते. पण प्रत्यक्षात त्याही पलीकडे जात योग हा यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी या आठ गोष्टींनी मिळून बनलेला आहे.

योगाभ्यासात 'जीवनशैली कशी असावी' हे समजावले आहे. यामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते. योगाचे विविध प्रकार, प्राणायाम, सात्त्विक आहार, ध्यान याने जीवन सुखकर होते. योगासनांमुळे जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन तयार होतो. मन स्थिर होण्यास मदत होते. मनाची चंचलता, नकारात्मकता कमी होते. त्यामुळे २१व्या शतकातील ताणतणावांना आणि स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी याचा चांगला उपयोग होतो.

योग : योगासने योगाचा एक अष्टमांश भाग आहे. योग म्हणजे चित्त वृत्तीचा निरोध करणे. वृत्ती म्हणजे काय? त्यावर नियंत्रण ठेवायचे म्हणजे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.



प्राणायाम (श्वसनाचा व्यायाम) : प्राण म्हणजे जीवन शक्ती, आयाम म्हणजे तिला नियंत्रित करणे, श्वासाची गती जर कमी केली तर आयुष्य तेवढे जास्त. ही श्वासाची गती जर कमी करायची असेल तर प्राणायाम करणे गरजेचे आहे. श्वास कसा घ्यावा, संथ श्वसन, दीर्घ श्वसन कसे करावे, कोणी व कधी करावे याला महत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीसाठी प्राणायाम वेगवेगळे असतात.

आपले शरीर अन्न, पाणी याशिवाय काही काळ राहू शकते, पण प्राणवायूशिवाय नाही. जसे व्यायामाने शरीरावर सकारात्मक बदल घडतात तसेच प्राणायामामुळे शरीर, मन आत्मा यामध्ये सकारात्मक बदल घडून ते बळकट होतात.

आहार : आपण काय खातो, कसे व केव्हा खातो, याला जीवनशैलीमध्ये महत्त्व असायला हवे. कारण खाण्याचा शरीरावर तसेच मन व विचारांवर परिणाम होतो. जसे अन्न घेऊ तसे विचार घडत जातात. यामुळे आहारालासुद्धा तितकेच महत्त्व असायला हवे. आपण कुठल्या प्रदेशात राहतो, राज्य कोणते, तिथले हवामान कसे आहे, यावरून आपला आहार ठरतो. विज्ञानाची प्रगती माणसाला सुखी करण्यासाठी होत आहे. पण त्याच्या अयोग्य वापरामुळे मानव अधिक तणावपूर्वक आयुष्य जगत आहे. जग जास्त जवळ आले, माणसातील संवाद वाढले, लोक एकमेकांशी जोडले गेले. जवळची माणसे लांब व लांबचे लोक जवळ आले. माणसांचे त्रास वाढले, कष्ट कमी झाले, पण माणूस असमाधानी होत गेला. मनावरील ताण वाढला व त्याचा परिणाम शरीरावर, वाढते वजन, गुडघेदुखी, डोकेदुखी, पाठदुखी अशा छोट्या त्रासापासून मधुमेह, उच्च रक्तदाब, कॅन्सर, त्वचेचे रोग, अल्सर, ॲसिडिटी असे अनेक विकार जडत जातात. म्हणजेच प्रत्येक व्याधीला 'मन' कारणीभूत असल्याचे दिसते. या सर्व त्रासासाठी आहार, विहार, व्यायाम, विचार यात बदल करणे आवश्यक असून योगाभ्यास हा या सगळ्यावरील उत्तम उपाय ठरू शकतो.

कुरकुरीत पनीर पकोडा



साहित्य : पनीर - 250 ग्रॅम, बेसन - 1 कप, तांदळाचे पीठ - 3 कप, लाल तिखट - 1 चमचा, हळद - 1/2 चमचा, धणे जिरे पूड - 1 चमचा, ओवा - चिमूटभर, मीठ, आवश्यकतेनुसार पाणी.

कृती : सर्वप्रथम बेसन, तांदळाचं पीठ, लाल तिखट, हळद, धणे जिरे पावडर, ओवा आणि मीठ एकत्र करून त्यात थोडं पाणी घालून घट्टसर पीठ तयार करून घ्या. आता पनीरचे चौकोनी तुकडे करा. हे पनीरचे काप पिठात चांगले बुडवा, जेणेकरून पनीरला चहुबाजूंनी बॅटर लागेल. कढईत तेल गरम करून त्यात पनीर पकोडे सोनेरी रंगापर्यंत तळून घ्यावेत. तळलेले पकोडे टिश्यू पेपरवर काढा, त्यातील जास्तीचे तेल निघेल. गरमागरम पनीर पकोडे हिरवी मिरच्यांच्या चटणीबरोबर सर्व्ह करा.

ॲलर्जी असणाऱ्या त्वचेसाठी मेकअप

त्वचा संवेदनशील असेल तर अनेक अडचणींना तोंड द्यावं लागतं. कोणतंही मेकअप प्रॉडक्ट वापरण्यापूर्वी त्याचं त्वचेवर परीक्षण करणं गरजेचं ठरतं. ॲलर्जीमुळे अनेक मेकअप प्रॉडक्ट वापरणं अवघड होऊन बसतं. ॲलर्जिक त्वचेचा मेकअप कसा करावा याविषयी...





- ॲलर्जिक त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी मेकअपची सुरुवात क्लिंजिंग आणि मॉइश्चरायझिंगने करावी. त्यानंतर फाऊंडेशनचा अत्यंत पातळ थर लावून घ्यावा.
- नंतर चीकबोन्सच्या थोडं खाली, नाकाच्या दोन्ही बाजूला आणि कपाळाच्या बाजूंना ब्रोंजर लावा. नाकाला अधिक उठाव येण्यासाठी काँट्यूर मेकअप करा.
- ॲलर्जिक त्वचा असणाऱ्यांनी डोळ्यासाठी मेकअपची उत्पादनं खरेदी करताना सावधगिरी बाळगावी.
- टिश्यू आणि मेकअप ब्रशचा वापर टाळण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा. त्याऐवजी सुती रुमालाचा वापर करावा.
- ॲलर्जीमध्ये डोळ्याखालच्या त्वचेवर सर्वात जास्त परिणाम होतो. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी अंडर आय क्रीम लावावं.
- कोणत्याही उत्पादनाचा वापर करण्यापूर्वी ते तुमच्या त्वचेसाठी कितपत उपयोगी ठरेल याची माहिती घ्या.
- ॲलर्जिक स्कीन असणाऱ्यांनी शक्यतो स्वतःचे मेकअप प्रॉडक्ट इतरांबरोबर शेअर करू नयेत.

भात खाल्ल्याने वजन वाढते, पोट सुटते म्हणून तुम्हीही भात खाणे टाळता का? मग भातासंबंधित असलेले तुमचे समज-गैरसमज दूर करण्याची गरज आहे. सेलिब्रेटी न्यूट्रिशनिस्ट ऋजुता दिवेकर सांगते आहे वरण-भात खाण्याचे महत्त्व आणि फायदे...

'या' फायद्यांसाठी आहारात भाताचा अवश्य समावेश करा!

हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी

वरण भात खाल्ल्याने तुमच्या हृद्याचे आरोग्य चांगले राहते. तर ब्लड शुगर नियंत्रित राहते. इतकंच नाही तर वरण भात पचायलाही हलका असतो. त्याचबरोबर रात्रीची झोपही नीट येण्यास मदत होते. तसंच भात खाल्ल्याने पोटातील आतडे मजबूत होतात आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होण्यास मदत होते.

विविध फायदे

भातात अमिनो ॲसिड भरपूर प्रमाणात असते. जे मेंदूच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. याचा प्रभाव मसल्सवरही होतो. वर्कआऊट करत असाल तर भात खाणे लाभदायी आहे.कारण भात खाल्ल्याने वर्कआऊटचे परिणाम लवकर दिसून येतात. भातात मेथिओनिन, व्हिटॅमिन बी१ आणि रेजिस्टेंट स्टार्च असतात. मेथिओनिनमध्ये असलेल्या अमिनो ॲसिडमध्ये सल्फरचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे त्वचेच्या अनेक समस्या दूर होण्यास मदत होते. त्याचबरोबर वाढत्या वयाचा परिणाम कमी करण्यासाठीही भात खाणे फायदेशीर ठरते.



त्वचेसाठीही फायदेशीर

लिव्हरमधील विषद्रव्य (टॉक्झिन्स) बाहेर टाकण्यासही मदत होते. चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्या, केस पांढरे होणे यावर उपाय म्हणूनही भात खाल्ला जातो. कॅन्सर सारख्या दुर्धर आजारावर देखील भात खाणे फायदेशीर ठरते.

जीवनशैलीतील 'या' बदलांमुळे तुम्ही निरोगी दीर्घायुषी व्हाल!

रात्री झोपण्यापूर्वी अनेक जण सकाळी लवकर उठून व्यायाम करण्याचा विचार करतात. मात्र सकाळी लवकर उठणे शक्य होत नाही. आपल्या धकाधकीच्या आणि गुंतागुंतीच्या जीवनशैलीचा आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. त्यामुळे या धावपळीतून स्वत:साठी वेळ काढणे गरजेचे आहे. तर आपल्या जीवनशैलीत काही लहान सहान बदल केल्यास तुम्हाला निरोगी दीर्घायुष्य लाभेल. पाहुया काय आहेत ते बदल...

शारीरिक हालचाली बंद करू नका : वाढत्या वयानुसार अवयवांचे काम करणे काहीसे मंदावते. पण तुम्ही थांबू नका. हालचाल, काम करणे बंद करू नका. जिने चढा. चाला, फिरा. असा काहीना काहीतरी शारीरिक हालचाली चालू राहू द्या. त्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होईल.

वजन नियंत्रित ठेवा : सात्त्विक, संतुलित आहार घ्या. त्यामुळे वजन गरजेपेक्षा अधिक वाढणार नाही.



आहारात हिरव्या पालेभाज्या, फळे यांचा समावेश करा.

आनंदी रहा : घरी किंवा ऑफिसमध्ये नेहमी गंभीर राहणे गरजेचे नाही. तुम्ही कुटुंबातील सदस्यांसोबत, मित्रमंडळींसोबत हसत खेळत राहू शकता. त्यामुळे तुमचे शरीर-मन रिलॅक्स होईल. थकवा दूर होईल आणि तुम्ही प्रसन्न रहाल.

भावना शेअर करा : भावभावना, अनुभव शेअर केल्याने मन मोकळे होते. भावना, विचारांचे आदान प्रदान झाल्याने नवीन काही शिकायला मिळते.

अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर्स ब्लॉक करण्याची ही आहे सोपी पद्धत

अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर्स ब्लॉक करण्याची एक सोपी पद्धत पाहूया, ज्यामुळे तुमच्या फोनवर येणारे अनावश्यक आणि अनोळखी कॉल्स थांबवता येतात.

अनोळखी फोन नंबर अनेकदा डोकेदुखी ठरू शकतात. त्यामुळे जर तुम्हाला अँड्रॉइड फोनवर अनावश्यक आणि अनोळखी नंबर्स ब्लॉक करायचे असतील तर आम्ही तुम्हाला त्याची एक सोपी पद्धत सांगणार आहोत. गुगलच्या फोन ॲपवर बाय डिफॉल्ट एक पद्धत उपलब्ध आहे. परंतु इतर कंपन्यांची पद्धत वेगवेगळी आहे.

आम्ही तुम्हाला अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर्स ब्लॉक करण्याची पद्धत सांगणार आहोत, ज्याची सुरुवात गुगल फोन ॲपपासून करून जे गुगल पिक्सल वनप्लस आणि नोकियाच्या स्मार्टफोन्समध्ये आधीपासून इंस्टॉल करण्यात आलेलं असतं. तुम्ही हे गुगल प्ले स्टोअरवरून देखील तुमच्या अँड्रॉइड डिव्हाइसवर डाऊनलोड करू शकता. आम्ही या आर्टिकलमध्ये सॅमसंग आणि शाओमी फोनवरदेखील अनोळखी नंबर ब्लॉक करण्याची पद्धत सांगितली आहे.

गुगल फोन ॲपवर अनोळखी नंबर कसे ब्लॉक करायचे

- गुगल फोन ॲप असलेल्या अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर ब्लॉक करण्यासाठी :
- फोन ॲप ओपन करा.
- डायलर सर्च बारच्या वरच्या बाजूला उजवीकडे थ्री डॉट बटन प्रेस करा.
- सेटिंग्सवर टॅप करा आणि ब्लॉक्ड नंबर वर जा.
- अननोन ऑप्शन टर्न ऑन करा.

लक्षात असू द्या अँड्रॉइडमध्ये अननोनचा अर्थ ते नंबर्स नव्हे जे तुमच्या फोनमध्ये सेव्ह केले गेले नाहीत. तर त्याचा अर्थ जे तुमच्या कॉलर आयडीमध्ये प्रायव्हेट किंवा अननोन म्हणून फ्लॅश होतात.

'ड' जीवनसत्त्व आणि कॅल्शियमचे सप्लिमेंट्स घेतल्याने फ्रॅक्चर्स टाळता येऊ शकतात का?



हाडांचे आरोग्य चांगले राहावे, याकरिता कॅल्शियमच्या सप्लिमेंट आपण घेतो, आणि आपण घेत असलेले कॅल्शियम शरीरामध्ये शोषले जावे याकरिता 'ड' जीवनसत्त्वाचे सप्लिमेंटदेखील आपण घेत असतो. ही दोन्ही तत्त्वे आपल्या शरीरातील हाडांच्या आरोग्याच्या दृष्टीने जरी महत्त्वाची असली, तरी प्रसंगी एखाद्या लहानशा अपघातामुळे किंवा पडल्याने होणारी हाडांची फ्रॅक्चर्स या सप्लिमेंट्समुळे टाळता येऊ शकत नसल्याचे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका शोधनिबंधात म्हटले आहे. हा शोधनिबंध जर्नल ऑफ अमेरिकन मेडिकल असोसिएशनतर्फे प्रसिद्ध करण्यात आला आहे. ज्या व्यक्तींना ऑस्टियोपोरोसिस आहे, म्हणजेच ज्या व्यक्तींची हाडे ठिसूळ झालेली आहेत, त्यांची हाडे अगदी लहानशा अपघातानेदेखील फ्रॅक्चर होऊ शकतात. हाडांची झीज कमी व्हावी याकरिता अशा व्यक्तींना कॅल्शियम आणि 'ड' जीवनसावाची सप्लिमेंट दिली जातात. पण या सप्लिमेंटचा उपयोग फ्रॅक्चर होण्यासाठी कितपत होऊ शकतो याबद्दल शास्त्रज्ञांच्या मिश्र प्रतिक्रिया आहेत. या अनुषंगाने चीनमधील तिआनजिन हॉस्पिटलमधील शास्त्रज्ञांनी एक सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणाअंतर्गत, पन्नास वर्षे वयापेक्षा जास्त वय असणाऱ्या वृद्ध व्यक्तींचे निरीक्षण करण्यात आले. या सर्व व्यक्ती 'ड' जीवनसत्त्व व कॅल्शियम सप्लिमेंट घेणाऱ्या होत्या. या व्यक्तींच्या चाचण्या करण्यात येऊन, त्याद्वारे हे निदान करण्यात आले की, 'ड' जीवनसत्त्व व कॅल्शियमच्या सप्लिमेंट घेऊनदेखील या व्यक्तींना एखाद्या इजेमुळे हाडे फ्रॅक्चर होण्याची शक्यता होती.

सिंहस्थपूर्वी नाशिक अग्निशमन दलाची ताकद वाढणार

१८.३० कोटींच्या निधीतून १२ अत्याधुनिक वाहनांची खरेदी

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक



आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक महापालिकेचा अग्निशमन विभाग अधिक सक्षम आणि सज्ज होणार आहे. आपत्कालीन परिस्थितींना जलद प्रतिसाद देण्यासाठी विभागाच्या ताफ्यात १२ अत्याधुनिक अग्निशमन वाहनांची भर पडणार असून त्यासाठी १८ कोटी ३० लाख रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. महापालिकेने पुण्यातील हायटेक कंपनीकडून या वाहनांची खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व वाहने ऑक्टोबर महिन्यापर्यंत नाशिकमध्ये दाखल होण्याची अपेक्षा आहे. सध्या विभागाकडे ३७ वाहने असून त्यापैकी १५ वाहने कालबाह्य झाल्याने नवीन वाहनांची गरज निर्माण झाली होती.

सिंहस्थ काळात लाखो भाविक नाशिकमध्ये दाखल होणार असल्याने सुरक्षा आणि आपत्कालीन व्यवस्थापनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. याच अनुषंगाने अग्निशमन विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज अशी नऊ मोठी अग्निशमन वाहने आणि तीन रॅपिड इंटरव्हेन्शन व्हेईकल (आरआयव्ही) खरेदी करण्याचे नियोजन केले आहे.शहराचा वाढता विस्तार, नव्याने विकसित होणारे निवासी व व्यावसायिक भाग आणि वाढत्या आपत्कालीन घटनांच्या पार्श्वभूमीवर ही वाहने महत्त्वाची भूमिका बजावतील. नव्या वाहनांमुळे घटनास्थळी कमी वेळेत पोहोचणे शक्य होणार असून बचावकार्य अधिक परिणामकारक होईल. परिणामी जीवित व वित्तहानी टाळण्यास मोठी मदत मिळणार आहे.

आगींवर त्वरित नियंत्रणासाठी आरआयव्ही उपयुक्त

नाशिकमधील अनेक अरुंद रस्ते, गल्ल्या आणि दाट लोकवस्तीच्या भागांत मोठ्या अग्निशमन वाहनांना पोहोचताना अडचणी येतात. त्यामुळे आग नियंत्रणात आणण्यास विलंब होण्याची शक्यता असते. नव्याने दाखल होणारी तीन रॅपिड इंटरव्हेन्शन व्हेईकल अशा ठिकाणी जलदगतीने पोहोचून तातडीची मदत आणि आग नियंत्रणाचे काम प्रभावीपणे करू शकणार आहेत.

पोलिसांची राहणार करडी नजर

- रामकुंड परिसरात दंगल नियंत्रण पथक तैनात राहणार असून दिवसपाळीत नऊ तर रात्री पाच असे एकूण १४ अंमलदार कार्यरत राहतील.
- प्रत्येक घाटावरील नियुक्त अधिकाऱ्यासोबत संबंधित पोलिस ठाण्यातील तीन अंमलदार आणि दोन ट्राफिक वॉर्डन नियुक्त करण्यात.
- बॉम्ब शोधक व नाशक पथक, श्वान पथक, सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष आणि ड्रोन निरीक्षणाच्या माध्यमातून संवेदनशील भागांवर सतत लक्ष ठेवले जाणार.
- महत्त्वाच्या धार्मिक स्थळांची सुरक्षा वाढविण्यासोबतच पाकीटमारी, चोरी, हरवलेली मुले, महिला छेडछाड, फसवणूक यावर विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश.
- वाहतूक विभागाशी समन्वय ठेवून संपूर्ण वाहतूक आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे पोलिसांना निर्देश देण्यात
- आपत्कालीन वाहनांसाठी स्वतंत्र मार्ग राखून ठेवणे, नो-पार्किंगमध्ये उभी असलेली वाहने हटविणे तसेच भाविकांना पार्किंग व शटल सेवांबाबत मार्गदर्शन करण्याची पोलिसांवर जबाबदारी
- रामकुंड परिसरात प्रवेश व निर्गमन मार्ग स्वतंत्र ठेवणे, आवश्यकतेनुसार पयार्यी मागार्चा वापर करणे, बॅरिकेडिंग व दिशादर्शक फलक कार्यान्वित ठेवणे तसेच चेंगराचेंगरी टाळण्यासाठी सातत्याने गदीर्चे निरीक्षण करणे.

अयोध्येत देणगी चोरीचा खेळ कुणी केला? मास्टरमाइंड कोण?

ट्रस्टचे महासचिव चंपत राय आणि विश्वस्थ अनिल मिश्रांचा राजीनामा

श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने दाखल केलेल्या एफआयआरमध्ये ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांच्या चालकासह एकूण आठ जणांना आरोपी करण्यात आलंय. ज्यानंतर चंपत राय यांच्यासह विश्वस्थ अनिल मिश्रा यांना तडकाफडकी राजीनामा दिला.

■मुंबई। प्रतिनिधी,



हिंदूंच्या श्रद्धेचे सर्वात मोठे प्रतीक मानल्या जाणाऱ्या राम मंदिरात गेल्या काही दिवसांपासून देणगी चोरीच्या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे. मात्र आता प्रभू रामांच्या नावावर अयोध्येत लूट करणारे आरोपी कायद्याच्या तावडीतून सुटणार नाहीत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कठोर भूमिकेनंतर तपासात एकामागोमाग एक नवे खुलासे समोर येत आहेत.

सध्या अटक करण्यात आलेले ८ आरोपी कोण?

- रमाशंकर यादव उर्फ टिन्नू
- अनुकल्प मिश्रा
- अविनाश शुक्ला
- करुणेश पांडेय
- मनीष यादव
- लवकुश मिश्रा
- रमाशंकर मिश्रा
- सुभाष श्रीवास्तव

हिंदूंच्या श्रद्धेशी खेळ करणाऱ्या सर्व आरोपींवर कायद्याचा फास अधिक घट्ट होत चाललाय. देणगी चोरीप्रकरणी पोलिसांनी सर्व आठ आरोपींना अटक केलीय. याशिवाय, चोरीच्या प्रकरणात आरोपींच्या कबुलीजबाबावरून योगी सरकारची पोलिस यंत्रणा अयोध्येतील विविध भागांत छापेमारी करतेय. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने दाखल केलेल्या एफआयआरमध्ये ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांच्या चालकासह एकूण आठ जणांना आरोपी करण्यात आलंय. ज्यानंतर चंपत राय यांच्यासह विश्वस्थ अनिल मिश्रा यांना तडकाफडकी राजीनामा दिला.

पण, राममंदिराच्या एफआयआरमध्ये मात्र चंपत राय, डॉ. अनिल मिश्रा तसेच इतर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची नावे समाविष्ट करण्यात आलेली नाहीत.

देणगी चोरीच्या प्राथमिक तपासात रमाशंकर यादव उर्फ टिन्नू याची भूमिका महत्त्वाची मानली जातेय. मात्र लवकरच आणखी काही जणांची नावेही समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर विरोधकांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल सुरू केला आहे.

राममंदिर दानचोरी प्रकरणात केवळ छोट्या आरोपींना अटक करण्यात आल्याचा विरोधकांचा आरोप आहे. याप्रकरणात मोठ्या लोकांना वाचवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप केला जातोय. मात्र या संपूर्ण प्रकरणाचे सत्य तपास पूर्ण झाल्यानंतरच समोर येणार आहे.

मुंबईकरांना मिळणार पुनर्प्रक्रिया केलेले पिण्यायोग्य पाणी... भांडुपमध्ये तृतीय स्तरावरील प्रक्रिया केंद्राला मंजुरी, १ हजार ८२४ कोटींचा प्रकल्प

जलबोगदा, उदंचन केंद्र उभारणार

धारावी, घाटकोपर आणि भांडुप या मलजल प्रक्रिया केंद्रांना भांडुप जलशुद्धीकरण केंद्राशी जोडण्यासाठी १,००० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचा भूमिगत जलबोगदा उभारण्याचे कामही प्रगतिपथावर आहे. मात्र, भांडुप मलजल प्रक्रिया केंद्रातील बोगद्याची पातळी जलशुद्धीकरण केंद्राच्या बोगद्यापेक्षा कमी असल्याने प्रक्रिया केलेले पाणी पुढे नेण्यासाठी आवश्यक दाब निर्माण करणारे तृतीय स्तरावरील उदंचन केंद्र उभारावे लागणार आहे. याची क्षमता १,००० एमएलडीपर्यंत वाढवण्याची तरतूद आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,



पर्यावरण संरक्षण, जलस्रोतांचे संवर्धन आणि पाण्याच्या पुनर्वापराला चालना देण्यासाठी मुंबई महापालिकेने हाती घेतलेल्या महत्त्वाकांक्षी मलजल पुनर्प्रक्रिया प्रकल्पांसाठी आणखी एक पाऊल पुढे पडले आहे. भांडुप मलजल प्रक्रिया सुविधा केंद्रात ५०० दशलक्ष लिटर प्रतिदिन (एमएलडी) क्षमतेचे तृतीय स्तरावरील संस्कारण व उदंचन केंद्र उभारण्याच्या सुमारे १,८२४ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. दरम्यान, निविदा प्रक्रियेवर बोट ठेवत काँग्रेसचे पालिकेतील गटनेते आश्रफ आजमी यांनी थर्ड पार्टी ऑडिटची केली आहे.

पर्यावरण संरक्षण, जलस्रोतांचे संवर्धन आणि पाण्याच्या पुनर्वापराला चालना देण्यासाठी मुंबई महापालिकेने हाती घेतलेल्या महत्त्वाकांक्षी मलजल पुनर्प्रक्रिया प्रकल्पांसाठी आणखी एक पाऊल पुढे पडले आहे. भांडुप मलजल प्रक्रिया सुविधा केंद्रात ५०० दशलक्ष लिटर प्रतिदिन (एमएलडी) क्षमतेचे तृतीय स्तरावरील संस्कारण व उदंचन केंद्र उभारण्याच्या सुमारे १,८२४ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.

मलजल पुनर्प्रक्रिया प्रकल्प पाच वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. महापालिकेने शहरातील समुद्रात सोडल्या जाणाऱ्या मलजलावर अत्याधुनिक द्वितीय आणि तृतीय स्तरावरील प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रक्रियेतून तयार होणारे पाणी भांडुप जलशुद्धीकरण केंद्रात आणून त्यावर अंतिम शुद्धीकरण केले जाईल. त्यानंतर हे पाणी मुंबईकरांच्या पिण्यासाठीच्या जलपुरवठ्यात वापरण्याची योजना आहे.

सात केंद्रात पुनर्प्रक्रियेचे पाणी उपलब्ध होणार

सध्या वरळी, वांद्रे, घाटकोपर, धारावी, मालाड, वसोर्वा आणि भांडुप या सात ठिकाणी मलजल प्रक्रिया केंद्रांची उभारणी सुरू असून ती टप्प्याटप्प्याने २०२८ पर्यंत कार्यान्वित होणार आहेत. ही केंद्रे सुरू झाल्यानंतर दररोज १,२३२ दशलक्ष लिटर प्रक्रिया केलेले पाणी पुनर्वापरासाठी उपलब्ध होणार असून उर्वरित पाण्यावर दुय्यम प्रक्रिया करून ते समुद्रात सोडले जाणार आहे.

13 वर्षीय मुलीच्या घरात तरुण घुसला, हात पाय बांधून...

राजस्थानच्या बिकानेर जिल्ह्यातीस खाजूवाला मध्ये 13 वर्षीय अल्पवयीन मुलीच्या घरात घुसून दोन वेळा लैंगिक अत्याचार केले. आरोपी तरुण गावातीलच असल्याचे सांगण्यात येते. तरुणाने पीडितेचे हातपाय बांधून तिच्यावर अत्याचार केला. ही घटना 20 जून रोजी घडली होती, भीतीमुळे मुलगी गप्प राहिली होती. तिच्या कुटुंबीयांनी तिला वारंवार विचारपूस केली असता, तिने घडलेला सर्व प्रकार सांगितला. संबंधित प्रकरणाची आईने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांच्या माहितीनुसार, खाजूवाला पोलीस ठाणे परिसरातील एका गावात हा माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. पीडितेचे (वय 13) हात पाय बांधून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला होता. या घटनेनंतर आरोपीने लहान मुलीला धमकी दिली की, जर कोणाला काही सांगितल्यास मारण्यात येईल. धमकीनंतर पीडित मुलगी भयभीत झाली आणि शांतच राहू लागली होती. कुटुंबीयांतील लोकांना मुलीच्या वागण्यात बोलण्यात बदल झाल्याचं जाणवलं. नंतर त्यांनी तिची सातत्याने विचारपूस केली. अनेकदा तिची विचारपूस केल्यानंतर पीडितेनं रडत रडत घडलेला सर्व प्रकार सांगितला. कुटुंबीयांना याबाबत माहिती मिळताच, त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी पीडितेचा मेडिकल तपास केल्यानंतर प्रकरण हाताळलं. पोलिसांनी आरोपीची ओळख केली असून अटक करण्यासाठी त्याचा तपास सुरू केला आहे. आरोपीच्या अटकेसाठी ठिकठिकाणी तपास छापे टाकून तपास केला जात आहे. पोलिसांनी स्थानिकांकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. घटनेची माहिती मिळताच गावात मोठा आक्रोश निर्माण झाला होता. ग्रामीण भागात आरोपी विरोधात कारवाईची मागणी केली आहे.



पुण्यात एका भोंदूबाबचा हादरवणारा प्रकार समोर

अशलील व्हिडिओ पाहायचा अन् भोंदू महिला अनुयायींसमोरच तरुणीसोबत नको ते करायचा

गुप्तांगात बंदुकीची गोळी, दगड अन्... महिलेवर सामूहिक बलात्कार

बिहारच्या बेगुसराय जिल्ह्यातून माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. 11 जून रोजी रात्रीच्या सुमारास पाच नराधमांनी एका घरात घुसून एका महिलेवर सामूहिक बलात्कार केला. नराधमांनी केवळ अत्याचारच केला नाही, तर पीडितेवर क्रूरपणे हल्ला करत तिच्यावर अनन्वित अत्याचार केले. या घटनेदरम्यान आरोपींनी पीडितेच्या पतीला एका खोलीत कोंडून ठेवले होते. या अमानुष कृत्यानंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून फरार झाले असून पोलीस सध्या त्यांचा शोध घेत आहेत.

अमानुष अत्याचाराने बिहार हादरले : ही घटना चाकिया पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पीडितेने दिलेल्या जबाबानुसार, 11 जून रोजी रात्री 11:30 च्या सुमारास ती स्वच्छतागृहात गेली असता, पाच जणांनी बळजबरीने तिच्या घरात प्रवेश केला. त्यांनी आधी तिच्या पतीला खोलीत कोंडले आणि ती परत आल्यावर तिचे तोंड दाबून तिच्यावर सामूहिक अत्याचार केला. इतकेच नव्हे तर आरोपींनी धारदार शस्त्राने तिच्या शरीरावर विविध ठिकाणी गंभीर जखमा केल्या आणि तिला गंभीर अवस्थेत सोडून पळ काढला.

वैद्यकीय तपासणीत धक्कादायक वास्तव समोर : घटनेनंतर पीडितेला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते व प्राथमिक उपचारानंतर 12 जून रोजी तिला डिस्चार्ज देण्यात आला. मात्र, घरी परतल्यानंतरही तिच्या पोटात तीव्र वेदना होत राहिल्या. त्यामुळे 17 जून रोजी तिला पुन्हा जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तिची सखोल वैद्यकीय तपासणी केली असता अत्यंत धक्कादायक बाब समोर आली. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून पीडितेच्या गुप्तांगातून एक जिवंत काडतूस (बुलेट), एक दगड आणि लाकडाचा तुकडा बाहेर काढला, ज्यावरून आरोपींच्या क्रूरतेची भीषणता स्पष्ट होते.

विशेष तपास पथकाची स्थापना : या संतापजनक घटनेची दखल घेत पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाच्या चौकशीसाठी एक वैद्यकीय मंडळ स्थापन करण्यात आले आहे. तसेच घटनेचा सर्व बाजूंनी तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली असून, फरार आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांनी ठिकठिकाणी शोधमोहीम सुरू केली आहे.

पुण्यातील खराडी परिसरातील भोंदूबाबा राधामोहन मिश्रा प्रकरणाच्या तपासात अत्यंत संतापजनक तपशील समोर आले आहेत.

■पुणे। प्रतिनिधी,

पुण्यातील खराडी परिसरातील भोंदूबाबा राधामोहन मिश्रा प्रकरणाच्या तपासात अत्यंत संतापजनक तपशील समोर आले आहेत. पीडित तरुणीने नोंदवलेल्या पुरवणी जबाबात धक्कादायक खुलासे केले असून, मिश्रा स्वतःच्या महिला अनुयायांसमोरच पीडित तरुणीवर अत्याचार करत होता, अशी माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या अमानुष अत्याचाराला तो 'प्रसाद' असे संबोधत तिचा छळ करत होता. या प्रकरणी खराडी पोलिसांनी मुख्य आरोपी राधामोहन मिश्रा, स्वामी कंवलनयन आणि त्यांच्या सहा महिला अनुयायांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, सध्या सर्व आरोपी पोलीस कोठडीत आहेत.

पीडितेने दिलेल्या माहितीनुसार, 2013 मध्ये उबाळेनगर येथील आश्रमात वास्तव्यास असताना, तिथल्या महिला अनुयायीच तिला द्यायच्या शिक्षा ठरवत असत. आश्रमातील काम वेळेत पूर्ण न झाल्यास पीडितेला 'टेझर गन'चे शॉक दिले जायचे, तसेच मेणबत्तीचे चटके आणि जबर मारहाण केली जात होती. अनेकदा तिला विवस्त्र करून मिश्राच्या खोलीत ढकलले जायचे. या कृत्याला विरोध केल्यास, "आम्हीही हे सहन केले आहे, हाच कल्याणाचा मार्ग आहे," असे सांगून त्या महिला अनुयायी पीडितेचा आवाज दाबून टाकत असत.

गुंगीचे इंजेक्शन देऊन नको ते कृत्य

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, काही महिला अनुयायी आधी मिश्राला आक्षेपार्ह आणि घाणेरडे व्हिडिओ दाखवायच्या आणि त्यानंतर पीडितेवर अत्याचार केले जायचे. अत्याचार करताना विरोध होऊ नये म्हणून अनेक प्रसंगी पीडितेचे हात-पाय बांधण्यात आले, तिला गुंगी आणणारी इंजेक्शने देण्यात आली; तसेच तिला जबरदस्तीने मूत्र पाजल्याचा अमानुष दावाही पीडितेने आपल्या जबाबात केला आहे.

या प्रकरणात एक वेगळे कायदेशीर वळण समोर आले आहे. अटक करण्यात आलेल्या सहा महिला आरोपी या व्यवसायाने वकील असून, त्यांनी ॲड. गणेश गुप्ता यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात 'हेबिअस कॉर्पस' दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी असा दावा केला आहे की, या प्रकरणात पोलिसात एफआयआर पहाटे नोंदवला गेला, परंतु महिला आरोपींना त्यापूर्वीच म्हणजेच मध्यरात्री बेकायदेशीरपणे अटक करण्यात आली होती. मुख्य सरकारी वकील शिशिर हिरे यांनी या दाव्याला तीव्र विरोध दर्शवला.



विहीर अनुदानासाठी हजारोंची लाच मागितली अन...

■मुंबई। प्रतिनिधी,



सर्वसामान्य जनतेच्या विकासासाठी सरकार विविध योजना राबवत असते. मात्र या योजनांचा लाभ घेण्यासाठी वेगळीच मंडळी पुढे येते. आणि योजनेची मिळण्यासाठी काही रक्कम द्या म्हणून लाच मागते. असाच एक प्रकार जामनेर येथे घडला आहे. शासनाच्या विहीर अनुदान योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी जामनेर पंचायत समितीतील कंत्राटी तांत्रिक सहाय्यकाविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सागर अशोक नावकर (३२) असे गुन्हा दाखल झालेल्या कंत्राटी तांत्रिक सहाय्यकाचे नाव आहे. दरम्यान या घटनेमुळे शेतकरी वर्गात संतापाची भावना व्यक्त होत आहे.

नेमकं प्रकरण काय?

हा संपूर्ण प्रकार जामनेर येथे घडला आहे. तक्रारदार शेतकऱ्याची जामनेर तालुक्यात शेती आहे. शासनाच्या योजनेअंतर्गत त्यांना विहिरीचे अनुदान मंजूर झाले होते. विहीर मंजुरीनंतर प्रत्यक्ष त्या जागेची पाहणी करायची त्यानंतर तांत्रिक अहवाल सादर करणे आणि अनुदानाच्या पुढील प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करायची ही जबाबदारी तांत्रिक सहाय्यकाकडे होती. याचा फायदा सागर अशोक नावकरने उचलला.

आरोपानुसार, विहिरीच्या प्रस्तावित जागेची प्रत्यक्ष पाहणी करण्यापूर्वीच सागर नावकर यांनी ग्रामरोजगार सेवकाच्या माध्यमातून तक्रारदाराकडून तब्बल ३० हजार रुपयांची रक्कम स्वीकारली होती. त्यानंतर त्यांनी विहिरीच्या जागेची पाहणी केली, छायाचित्रे घेतली आणि संबंधित प्रक्रिया पूर्ण केल्याचे सांगितले. या प्रक्रियेनंतर तक्रारदाराला पंचायत समितीमार्फत टप्प्याटप्प्याने ६० हजार ९६६ रुपयांचे अनुदान प्राप्त झाले.भस्मासुराप्रमाणे आरोपींची भूक काही मिटली नाही त्यांनी पुन्हा लाचेची मागणी केली.

पुन्हा ३० हजार रुपयांच्या लाचेची मागणी

उर्वरित अनुदानाची रक्कम मिळण्यासाठी तक्रारदाराने पुन्हा तांत्रिक सहाय्यकाची भेट घेतली. त्यावेळी विहिरीची जागा बदलण्यात आल्याचे कारण पुढे करत पुढील अनुदान मंजूर करून देण्यासाठी आणखी ३० हजार रुपये द्यावे लागतील, अशी मागणी करण्यात आली. संबंधित रक्कम दिल्याशिवाय उर्वरित अनुदानाची प्रक्रिया पूर्ण होणार नाही असे तक्रारदाराला सांगण्यात आले. पैशांची पुन्हा व्यवस्था करणे शक्य नसल्याने तक्रारदाराने अखेर जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली.

६ एप्रिल रोजी तक्रारदार शेतकऱ्याने अधिकृत तक्रार दाखल केली. तक्रारीची विभागानेही गंभीर दखल घेत चौकशी सुरू केली. त्यानंतर नियमानुसार पडताळणी करण्यात आली. या पडताळणीदरम्यान पंचांसमक्ष तांत्रिक सहाय्यकाने उर्वरित अनुदान मिळवून देण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. पडताळणी अहवालाच्या आधारे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुढील कायदेशीर प्रक्रिया राबवत जामनेर पोलीस ठाण्यात सागर नावकर यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला.

शासनाच्या योजनेत वाटा कशाला ?

या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून संबंधित व्यवहार, अनुदान प्रक्रिया आणि यामध्ये इतर कोणाचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे. दरम्यान शासन खात्यातून वेतन सुरु असताना शासनाच्या योजनेत वाटा कशाला हवा हा मोठा प्रश्न आहे. शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने पारदर्शक व सुलभ व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असताना अशा प्रकारच्या घटनांमुळे योजनांबाबतचा विश्वास डळमळीत होत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

घराखाली खेळणाऱ्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार... भिवंडीतील हादरवणाऱ्या प्रकरणातील आरोपी 3 तासांत गजाआड

भिवंडीतील अत्याचार प्रकणात सर्वात मोठी बातमी समोर आली असून, कशेळीत अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना घडली. ज्यानंतर आरोपी 3 तासात गजाआड गेल्याची माहिती आहे.

■भिवंडी। प्रतिनिधी,

नसरापूर अत्याचार घटनेच्या जखमा ताज्या असतानाच आणखी एक काळीज पिळवटणारी घटना भिवंडीत घडली. भिवंडी कशेळीत घडलेल्या या घटनेमध्ये एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक बाब समोर आली. याबाबतची तक्रार दाखल होताच नरपोली पोलिसांनी अवघ्या 3 तासात आरोपीला अटक केली. पोलिस उपयुक्त डॉ. पवन बनसोड यांनी सदर कारवाईसंदभार्तील माहिती दिली. गुरुवार, 25 जून 2026 ला संध्याकाळी 5-5.30 च्या सुमारास कशेळी परिसरात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला शेजारी राहणाऱ्या आरोपीने खेळण्याचे आमिष दाखवून फ्लॅटमध्ये नेले. तिच्या भावाला पाणी आणायला पाठवून आरोपीने मुलीवर अत्याचार केला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि तातडीनं कारवाई सुरू केली.

आरोपी त्याच परिसरातला...

भिवंडीचे पोलीस उपायुक्त पवन बनसोड यांच्या माहितीनुसार, 'आम्हाला 112 आणि नागरिकांचा फोन आला. तातडीने पथक रवाना झाले. आरोपी पळून जाण्याच्या तयारीत होता, पण 2 ते 3 तासात त्याला अटक केली. पीडित मुलगी सध्या शासकीय रुग्णालयात उपचार घेत आहे. ढडउरड अंतर्गत गुन्हा दाखल आहे'. पोलिसांच्या माहितीनुसार आरोपी कशेळीतच शेजारी राहत होता. या खळबळजनक घटनेनंतर परिसरात तणावाचं वातावरण असून नागरिकांनी कठोर कारवाईची मागणी केली आहे. पुढील तपास नरपोली पोलीस करत आहेत.

घराखाली खेळत असतानाच...

भिवंडी तालुक्यातील कशेळी येथे राहणारी 7 वर्षांची मुलगी घराच्या खाली भावासोबत खेळत होती. यावेळी आरोपीने तिला खाण्यासाठी पैसे देण्याचं आणि खेळण्याचं आमिष दाखवून त्यानं आपल्या फ्लॅटमध्ये नेत तिथे मुलीवर अत्याचार केला. या घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आणि अत्याचारानंतर मुलीला तातडीने स्व. इंदिरा गांधी स्मृति उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं, जिथं तिच्यावर उपचार सुरू करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच नरपोली पोलीस ठाण्याबाहेर नागरिकांनी मोठी गर्दी करत आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करत नागरिकांनी जोरदार घोषणाबाजी केली. सध्या या घटनेमुळं परिसरात तणावाचं वातावरण असून, ढडउरड कायद्यांतर्गत याप्रकरणीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून आता पुन्हा एकदा मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com